# ज्ञान प्रबोधिनी : स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)
## वार्षिक वृत्त
राष्ट्रीय शके १९३७-३८(सन २०१५-१६)

## अनुक्रमणिका


* मनोगत
* किशोरी * युवती
* हिरकणी * बालवाडी * महिला
  * बचतगट * स्वयंरोजगार * आरोग्य * नेतृत्व
* विषेश लेख
  * क्री डा प्रात्यक्षिके * गाववार विज्ञान मेळावे


## मनोगत

तुम्हा सर्व वाचकांसमोर हे मनोगत मांडताना आम्हाला खूप आनंद होत आहे. पुणे जिल्ह्यातील शिवगंगा व गुंजवणी नदीच्या खोऱ्यात ज्ञान प्रबोधिनीच्या वतीने सुरु झालेल्या आम्हा ग्रामीण महिलांसाठीच्या कामाला २१ वर्ष पूर्ण होत आहेत. काम जरी सुरु महिलांसाठी झाले असले तरी आता ते आमच्या ठाम पाठिंब्यामुळे लेकी-सुना यांच्या पर्यंत पोहोचले आहे. आता तुम्ही आमच्या कडे आलात तर प्रबोधिनीच्या मार्गदर्शनाने आम्ही सर्व स्थानिक महिला या पुढाकार घेऊन गावपातळीवर काम करताना तुम्हाला दिसतील.

पण हे व्हायला वेळ लागला. २१वे वर्ष सुरू आहे आणि या वर्षी झालेला मोठा बदल किंवा मोठे काम म्हणजे त्या-त्या गावाचा प्रश्न काय हे आम्ही गावातील महिलांनीच चर्चेने निश्चित केले आणि त्या प्रश्नावर काम करायला सुरवात केली.! हे सर्व आम्ही ३६ गावच्या महिला आणि युवतींनी तंबूतील नेतृत्व शिबिरात ठरवले, आणि केले! त्यामुळे नेमकी गावांच्या गरजेची कामे पुढे येत गेली. यातले महत्त्वाचे म्हणजे या वर्षी वेल्ह्यातील कार्यकर्त्यांनी मनावर घेतल्यामुळे मुलींच्या सहनिवासाचा कायापालट झाला. आज मितीला सहनिवासात ५वी ते १२वी तील २४ मुली आणि ३ व्यवस्थापिका राहात आहेत. हे सगळे काम वेल्हे, आंबवणे आणि शिवापूर या कार्यालयाला आपापल्या कामाचे निवेदन सादर करणाऱ्या आपल्या कार्यकर्त्यांनीच उभे केले आहे. गावातल्या बाईने कामासाठी पुढे आले पाहीजे असे जेव्हा आम्ही पहिल्या दिवसापासून म्हणत खरं म्हणजे ऐकत आलो, तेव्हा आत्ताकुठे त्याचा शब्दार्थ आम्हाला कळला आणि तो वळला .... आता हे वळण आमच्यातल्या ५०-६० जणींना हळूहळू पडायला लागलंय. तशी मागच्या वर्षीच ४५०० महिलांनी एकत्र येऊन आम्हा मेळावा घेतला, तेव्हा, आमच्यातली शक्ती आम्हाला दिसली होती. मग याही वर्षी आम्ही पड खाल्ली नाही. कुणी आपल्या गावात आरोग्य शिबिरं घेतली, तर कुणी बालवाडी सुरू करण्यासाठी मदत केली. कोणी हिरकणींना जमवलं. हिरकणी म्हणजे ज्यांची मुलं लहान आहेत, ६ वर्षाच्या आतली आहेत अशा सर्व माता. त्या हिरकणींची शिबिरं घेतली. तर कुणी गावातल्या सगळ्या महिलांना एकत्र करून त्यांचंच एक तंबूतलं राहातं शिबिर घेतलं. ६ गावातल्या आम्ही सगळ्या एकत्र झालो आणि गावातल्या मंदिराच्या परिसरात तंबू ठोकून राहिलो असं पहिल्यांदाच आक्रित घडलं. त्या तंबूतही आम्ही महिलांचे आरोग्य शिबिर घेऊन दाखवले हे विषेश!

आता आम्ही आपापल्या गावांमध्ये कसे कसे काम करायचे हे ठरवायला दर महिन्याला ५-६ ठिकाणी वेगवेगळ्या लोकांसोबत बसू लागलोय. आधी ठरवायचं आणि मग करायचं हे आम्ही शिकलोय. या वर्षीचा तोच आमचा सर्वात महत्त्वाचा धडा आम्ही गिरवलाय. आता आम्ही जमतोः-

**शिवापूरला**: दर २२ तारखेला..... जिजामाता प्रबोधन केंद्राच्या सदस्या म्हणून... (१५ ठिकाणच्या १५ जणी)

**आंबवण्याला**: नवदिशा बैठकीत- दर महिन्याच्या १२ तारखेला...... (२० ठिकाणच्या २५ जणी)

**वेल्ह्याला**: दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी मावळातल्या (१५ ठिकाणच्या१५ जणी)

**सुकाणू बैठक**- नियमित काम करणाऱ्या कार्यकर्त्या नियोजन निवेदनासाठी- १८ जणी

**सहविचार बैठक**- दर महिन्याला मा. संचालक आणि मा. कार्यवाहांसोबत सहविचारासाठी (सगळ्या महिलांच्या वतीने ५ जणी)


### ज्ञान प्रबोधिनी संस्थेचे पदाधिकारी

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | कार्याध्यक्ष | उपकार्याध्यक्ष | संचालक | कार्यवाह |
|---|---|---|---|---|---|
| डॉ. रघुनाथ माशेलकर | डॉ. विजय केळकर<br>कि. बा. (अण्णा) हजारे | डॉ. प्र. ल. गावडे | श. बा. तथा रवि पंडित | डॉ. गिरीश श्री. बापट | वि. शं. देशपांडे |

या बैठकीत आम्ही सर्वांनी मिळून ठरवून या वर्षी २०१५-१६ मध्ये केलेल्या कामाचा आढावा तुमच्यासमोर ठेवत आहोत. त्यातील काही ठळक महत्त्वाच्या गोष्टी पुढील प्रमाणेः-

**यावर्षी झालेला महत्त्वाचा बदल पुढील प्रमाणे आहे.**

**आंवदाचं जाऊंद्या म्होरच्याला सुधरा..... किशोरी युवतींसाठीचे काम**

१. सोबत चालणाऱ्या किशोरींची संख्या आता झालीय ७५०.......

२. आमची एक प्रबोधिका वेल्ह्याला राहायला आली तिने ३ गावातल्या क़ॉलेजमधल्या १३५ मुलींबरोबर काम सुरू केले.

३. वेल्ह्यातल्या मैत्रिणी खंबीरपणे पाठीमागे उभ्या राहिल्या म्हणून आता वसतीगृहात राहून जास्ती मुली शिकू शकतील.

**आता नाही मी एकटी मला मिळाल्यात सया.....बचतगटाचे महत्त्वाचे काम. त्याच्या आधारावरच घर उभे!**

४. सगळ्या प्रबोधिका मैत्रिणींनी मदत केली, म्हणून १०० गटांना बँकेचं कर्ज मिळालं जवळजवळ दीड कोटी रुपये

५. या कर्जामुळे खोऱ्यातल्या घरांमध्ये घराचं रुप बदलायला आले.

**बाईच्या आरोग्यालाही महत्त्व ...... आरोग्याचा वाढता पसारा**

६. १४ तपासणी शिबिरांमधून २७ गावांमधल्या जवळजवळ ३५० महिला महिलांविषयक कॅन्सर संबंधी आरोग्य सत्र ऐकायला आल्या आणि १७८ जणींनी स्वतःला तपासून घेतलं.

७. ८० गावांमधून ६९८ गरोदर महिला तपासणीपर्यंत पोहोचल्या.

८. स्त्री रोग विषयक व कॅन्सर निर्मूलन विषयक ऑपरेशनसाठी साधारण २० ते २५ लक्ष रुपयांचे साहाय्य महिलांना मिळाले.( पाटणकर नर्सिंग होम, दीनानाथ रुग्णालय,नवले रुग्णालय)

९ **संधीः-** काहीतरी करून पाहिल्याशिवाय आपल्याला जमतंय की नाही हे कसे कळणार? यावर्षी आम्ही ठरवले की आपल्याबरोबर कोणी नसते, एकटे असतो म्हणून मागे राहायचे नाही. आमच्या नेतृत्व विभागाने सगळ्यांना वेगवेगळी संधी घेण्याचा अवसर दिला. त्यातून आम्ही खूप शिकलो. कोणी गावची सहल काढली. पूर्णपणे स्वतःच्या जीवावर, तीही परराज्यात, कोणी स्टॉलवर थांबून वस्तू विकल्या, कोणी वस्तू बनवून विकून पाहिल्या, कोणी पहिल्यांदाच बँकेचे कर्ज घरात आणले, तर कोणी गावात मेळावा योजला. यातून आम्ही खूप गोष्टी शिकलो.

११. **जन्मशताब्दी निमित्ताने आम्ही एकाचवेळी ३ मोठे कार्यक्रम केले.** ही या वर्षीची सर्वात जास्तीची मिळकत. आपण प्रत्येकीने एक काम केले, तर आपल्या संख्ये एवढी कामे होतील. पण सर्वांनी मिळून सगळ्याच कामाला आपले म्हंटले तर कितीतरी जास्ती काम करू शकू हे आम्ही शिकलो.

एकूण २५० जणींनी क्रीडा प्रात्यक्षिके सादर केली. कुठेही गडबड झाली नाही. क्रीडा प्रात्यक्षिकांमध्ये महिलांनी सर्वांसमोर लेझिमचा खेळ खेळून आणि ढोल वाजवून सर्वच रेकॉर्ड ब्रेक केले .

तर २० वर्षांमधल्या कामाचा अनुभव लिहून काढून आम्ही महिलांनी स्मरणिका पूर्ण केली. ५२ लेखिकांपैकी ३८ जणी असे लिखाण प्रथमच करीत होत्या! त्यातच कमी म्हणून की काय आमच्यातल्या २४ जणींनी सर्वांसमक्ष कोणते ना कोणते सामाजिक काम करीत राहण्याची प्रतिज्ञा घेतली.

असेच काम करण्याचे बळ आम्हाला आमच्या या एकत्र येण्यातून मिळो असे म्हणतो. तुमच्यासारखे वाचक,आणि गावातल्या शेवटच्या माणसापर्यंत पोहोचणारे देणगीदार यांच्याबद्दल मनात खूप प्रेम आहे. त्यांच्यामुळेच हे शक्य झाले तुम्हा सर्वांनाच मनःपूर्वक नमस्कार व धन्यवाद!

**सदैव तुमच्याच,**

**प्रबोधिका**

# किशोरी विकास

२००५ पासून सुरु झालेला किशोरी विकास उपक्रम आता स्थिरावला आहे. या वर्षी १५ शाळांमधल्या ४५ किशोरींसोबत आपण काम केले. आजपर्यंत २४ शाळेतील ७५० किशोरी या उपक्रमात सहभागी झाल्या. सर्व शाळांचा व किशोरींचा भरभरून प्रतिसाद या उपक्रमाला मिळत आहे.

**यावर्षी पाक्षिक तासिकांद्वारे किशोरी विकासमध्ये सहभागी शाळा**

| | शाळा | संख्या | | शाळा | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | वर्वे | ३८ | २ | कल्याण | २४ |
| ३ | माळेगाव | ४० | ४ | मंझाई आसनी | १० |
| ५ | कुरूंगवडी | २५ | ६ | विंझर | ३५ |
| ७ | अंबवणे | ५७ | ८ | दापोडे | २७ |
| ९ | सोंडे माथना | २१ | १० | वेल्हे | ५० |
| ११ | मांगदरी | २८ | १२ | निवी | ०९ |
| १३ | वांगणी | २० | १४ | पासली | २६ |
| १५ | कुसगाव | ४० | | एकूण किशोरी | ४५० |

ग्रामीण भागातील मुलींचा आत्मविश्वास वाढावा, त्यांनी मानसिक, शारीरिक व बौध्दिक दृष्ट्या सक्षम व्हावे यासाठी शालेय शिक्षणाला पूरक किशोरी विकास उपक्रमाची जोड देण्यात आली. वर्षभरात या किशोरींसाठी १८ सत्रे घेण्यात आली. ही सत्रे आशय तासिका आणि कौशल्य तासिकांमध्ये विभागली. आशय तासिकेत व्यक्तिमत्त्व विकसन कौशल्यांच्या ९ तर कौशल्य तासिकेत हस्त कौशल्यांच्या ९ तासिका झाल्या. वर्षभरात तासिकांमधून घेतलेले विषय पुढीलप्रमाणेः

**आशयः**कथाकथन करणे,संवाद कौशल्ये, चांगल्या सवयी,भावना परिचय ,विज्ञान प्रयोग, आरोग्य व आहार,बहूदिश विचार,अभ्यास कौशल्ये, प्रतिभा विकसन,

**हस्त कौशल्यः** शिवणाचा रुमाल, भरतकामाचे टाके, टिशू पेपरपासून फूल बनविणे, राखी तयार करणे,परसबाग, आकाशकंदील बनविणे, झेंडूचे फूल बनविणे, मेंदी, वारली पेंटिंग इ.

**खेळ**: डॉजबॉल, आस-पास, राजा ओळखा, जर-तर, यक्षप्रश्न, डुक्कर मुसंडी, शब्दटाळी, गाय म्हैस, जोडी-साखळी, परिचय खेळ

**आरोग्य** : 'आहार आणि आरोग्याचा परस्पर संबंध' या विषयावरील सत्र डॉ. मनिषाताई उपाध्ये यांनी घेतले. संतुलित आहाराचे महत्त्व त्यांनी सांगितले. मासिक पाळीविषयी किशोरींना तपशिलात माहिती दिली व त्या काळात काळजी कशाप्रकारे घ्यायची हेही सांगितले. 'उमलत्या वयाशी जुळवून घेताना' ही पौगंडावस्थेतील बदलांच्या संदर्भातील एक कार्यशाळा पुण्याच्या संवादिनी गटाने इयत्ता ९वीतील ६९ मुली, ८१मुलांसाठी घेतली.

*** कथाकथन स्पर्धा** : साने गुरूजी कथामालेच्या संयुक्त विद्यमाने दि. ९सप्टेंबर २०१५ या दिवशी न्यू इंग्लिश स्कूल, विंझर येथे कथाकथन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण दापोडे, विंझर, अंबवणे, कुरूंगवडी, माळेगाव, वांगणी, मांगदरी, कल्याण, कुसगाव या शाळेतील ६५ किशोरींनी सहभाग घेतला.जास्त संख्या असल्याने ८वी व ९वी असे दोन स्वतंत्र गट करून ही स्पर्धा घेउन, दोन्ही गटात ३-३ बक्षिसे देण्यात आली. स्पर्धेपूर्वी सर्व विद्यालयातून 'कथाकथन कसे करावे?' या विषयीचे मार्गदर्शन केले. ह्या तासाला वर्गात मुलींसोबत मुलांनाही बसू दिले त्यामुळे या मार्गदर्शनाचा लाभ त्यांनाही घेता आला. अशा प्रकारे यंदा ६५० मुला-मुलींना कथाकथन या विषयावर मार्गदर्शन केले.

*** सायकलींचे वाटप** : कथाकथन स्पर्धेचे औचित्य साधून लांबून चालत शाळेत येणाऱ्या गरजू मुलींना सायकलींचे वाटप करण्यात आले. दापोडे शाळा -२ व माळेगाव शाळा - २ अशा ४ मुलींना सायकली देण्यात आल्या. तसेच वर्षभरात नवीन व जुन्या पण चांगल्या स्थितीतल्या १६ सायकली गरजू मुलींना देण्यात आल्या.

*** तंबूतील निवासी शिबिर** : यावर्षी क्रीडा प्रात्यक्षिके घेण्याचे ठरले होते. त्याचा सराव करण्यासाठी तंबू शिबिराची योजना केली गेली. या निवासी शिबिरासाठी १० शाळांमधून ३३ गावातील १४० किशोरींनी सहभाग घेतला. संचलन, लेझीम, वेत्रचर्म, ढाल-तलवार, संगीत जोडी, बांबू नृत्य, मानवी मनोरे, सायकल कसरत, संगीताच्या तालावर दोरीच्या उड्या,वाद्य वाजवणे व गायन अशा १० प्रात्यक्षिकांची निवड झाली व त्यांचा सराव घेण्यात आला. ज्ञान प्रबोधिनीच्या निगडी क्रीडाकुल मधून १६ जणी तर स्वरूप वर्धिनी संस्थेच्या २ जणी या कौशल्य प्रशिक्षक म्हणून शिबिराला आल्या होत्या. सरावा नंतर ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे यांच्यासमोर क्रीडा प्रकारांचे सादरीकरण झाले. मा. सुभाषरावांचे मार्गदर्शन सर्वांना झाले. रंगीत तालमीच्यावेळी सुवर्णाताईंनी प्रात्यक्षिकां मागची भूमिका किशोरींना समजावून सांगितली.

तंबू शिबिरातील काही महत्त्वाचे मुद्देः-

- कुडकुडत्या थंडीतही मुलींचा सहभाग.
- जे ठरवू ते तडीस नेण्याची जिद्द ठेवून सराव झाला.
- १४० मुलींपैकी १२२ जणी या पहिल्यांदाच घरापासून दूर व नातेवाईकांशिवाय राहिल्या.
- शिबिराची संपूर्ण जबाबदारी किशोरी विकासच्या माजी विद्यार्थिनींनी उचलली.
- कोंढणपूर व अवसरवाडी येथील वारकरी संप्रदायातील मंडळींनी वारकऱ्यांचे तंबू मदत म्हणून उपलब्ध करून दिले.

*** विद्याव्रत संस्कार कार्यक्रमः** किशोरवयीन मुला-मुलींच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी सर्वात महत्त्वाचा व प्रबोधिनीच्या कामातील गाभ्याचा विषय म्हणजे विद्याव्रत संस्कार. किशोर वयात मनामध्ये प्रचंड उत्साह असतो. या वयातच त्यांची आकलन व ग्रहण करण्याची क्षमताही जास्त असते. किशोर वयातच त्यांना उच्च ध्येय ठरवणे म्हणजे काय? संकल्प करणे म्हणजे काय? केलेले संकल्प पूर्तीस नेण्यास मनाची शक्ती कशाप्रकारे वाढवावी? या विषयीचे मार्गदर्शन केले जाते. मन, शरीर व बुद्धीचे परस्परांशी असणारे नाते समजावून सांगितले जाते. त्यासाठी एकूण पाच व्याख्याने घेतली जातात. या व्याख्यानांमध्ये विद्याव्रतसंकल्पना, शारीरिक विकसन, मानसिक विकसन, बौद्धिक विकसन व राष्ट्रसेवा अशा विषयावर मुलां-मुलींनामार्गदर्शन केले जाते. नंतर

या वर्षी या वृत्तात आलेले सर्व काम या गटाने केले

## ज्ञान प्रबोधिनीः स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण)

* विभाग प्रमुखः सुवर्णा गोखले, बागेश्री पोंक्षे

*** महिला विभागः**

| | |
|---|---|
| बचतगट | : आशा सुर्वे |
| स्वयंरोजगार | : भारती कामठे, स्नेहा नित्सुरे (पुणे), स्वाती शिंदे (शिवापूर), सुरेखा दिघे (वेल्हे) |
| आरोग्य प्रमुख | : गंगूताई सांगळे, कावेरी शिवरकर (समन्वयक) |
| नेतृत्व प्रमुख | : भारती खासबागे |
| *** कार्यालय समन्वयक** | : हिरा जोरवेकर (शिवापूर),प्रतिभा कुंभार (आंबवणे),शैला भोंडेकर (वेल्हे) |
| *** बालवाडी व हिरकणी** | : तृप्ती कुलकर्णी |
| *** युवती विभाग** | : प्रतिभा स्वामी |
| *** किशोरी विभाग** | : अश्विनी ठाकर |
| *** वेल्हे सहनिवास** | : द्वारका वालगुडे, रंजिता लांडगे, कुंदा खंडागळे |

या शिवाय या वर्षी गावोगावच्या ६४ जणीनी कमित कमी ३ दिवस ते १२ दिवस असे गावपातळीवर प्रबोधिका म्हणून काम केले

विद्याव्रताची उपासना घेण्यात येते. विद्यार्थ्यांना विद्याव्रताचे स्मरण सतत व्हावे यासाठी व्रतचिन्ह दिले जाते. अशाप्रकारचे विद्याव्रतसंस्कार कार्यक्रम २०११ पासून किशोरी विकास उपक्रमाअंतर्गत घेण्यात येतात. असे ८ शाळांमधून १० कार्यक्रम झाले व ७१५ मुला–मुलींचे विद्याव्रत झाले.

यावर्षी विद्याव्रताची व्याख्याने प्रबोधिनीतील स्त्री– शक्ती प्रबोधन (ग्रामीण) विभागात १५ ते २० वर्षे कार्यरत असलेल्या महिला कार्यकर्त्यांनी घेतली! विद्याव्रत घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये होत असलेला बदल त्यांचे पालक व शिक्षक दोघांनाही जाणवत असल्याने या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

* **गावपातळीवरील किशोरांसाठीची शिबिरे**: ज्ञान प्रबोधिनी निगडी येथील शाळेतील इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांनी वेल्हे तालुक्यातील गावांमध्ये एक रात्री मुक्कामी जाऊन किशोरांसाठी शिबिरे घेतली. दापोडे, वांजळे, वांगणी, वांगणी वाडी, बोरावळे, या चार गावांमध्ये दि. ६ व ७ फेब्रुवारी२०१६ दरम्यान ७० किशोरवयीन मुलांचे शिबिर घेतले. यामध्ये एक गीत गायला शिकवले, कागदापासून विविधवस्तू बनवायला शिकवल्या, सूर्यनमस्कार तसेच विविध खेळ शिकवण्यात आले.

* **पालक सभा**: किशोरवयीन मुलींसोबतचे काम शाळांमध्ये सुरू केल्यामुळे तासिका नियमित होतात, परंतु निवासी शिबिरांसाठी मुलींनी जास्तितजास्त संख्येने उपस्थित राहावे म्हणून त्यांच्या पालकांपर्यंत पोहचणे गरजेचे होते. त्यासाठी१९ ते २५ नोव्हेंबर या काळात पाबे(लिम्बार वाडी), सोंडे सरपाले, वडगाव झांजे, मांगदरी, वांगणी, वांगणी वाडी, निगडे या सात गावांमधून पालकसभा घेण्यात आल्या. सर्व ठिकाणी मिळून एकूण ७४ पालक सभेसाठी उपस्थित होते. या सभेत किशोरी विकास उपक्रमात होत असलेल्या कार्यक्रमांची माहिती पडद्यावर दाखविण्यात आली तसेच प्रबोधिनीच्या वतीने ग्रामीण भागात चालणाऱ्या अन्य उपक्रमांची माहिती देण्यात आली. पालकांना असलेल्या शंकांचे निरसन करण्यात आले. पालकांनाही किशोरी विकास उपक्रमाबरोबरच अन्य चालणारे उपक्रम समजले व प्रबोधिनीच्या कामाचा पट लक्षात आला.

* **ग्रंथालय**: किशोरी विकास उपक्रमा अंतर्गत अवांतर वाचनासाठी गावपातळीवर फिरते ग्रंथालय सुरू करण्यात आले. मागील वर्षी एकूण ६ गावांमधून ग्रंथालय चालविण्यात आले. भट्टी, अंत्रोली, पाल बुद्रुक, विंझर, कोदवडी, अंबवणे या सहा गावांमध्ये प्रत्येकी २५ पुस्तकांचा संच असा एकूण १५० पुस्तकांचा संच गावपातळीवर देण्यात आला होता. ग्रंथालयाची जबाबदारी स्थानिक कार्यकर्त्यांनी घेतली आहे.

* **शिष्यवृत्ती**: मुलींना शिकण्यासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून आपण शिष्यवृत्त्या दिल्या. ५वी ते १०वी पर्यंतच्या मुलींना रु. ७५०/– प्रमाणे, तर ११वी–१२ वी साठी रु.१०००/– प्रमाणे अशा शिष्यवृत्या दिल्या. एकूण ३६ मुलींना रु. ३५,०००/– रकमेच्या शिष्यवृत्त्या दिल्या. या वर्षी अश्विनीताई ठाकर यांनी किशोरी विकासच्या सर्व उपक्रमाची जबाबदारी सांभाळली.

*****

# युवती विकास

२०१५–१६ या वर्षी युवती विकासच्या कामाला प्रतिभा कुंभार यांच्या सोबत पूर्ण वेळ देणाऱ्या प्रतिभा स्वामी ह्या कार्यकर्त्या आल्यामुळे दोघींच्या जोरावर यंदा युवती गटाचे विशेष उल्लेखनीय काम झाले.

* **वेल्हे सहनिवास**: प्रतिभाताई स्वामी या कार्यकर्त्या वेल्हे मुक्कामी राहिल्यामुळे १५ वर्षां पुढील ५युवतींच्या निवासाची सोय करता आली. निवासाच्या या सोयीमुळे त्यांचा अभ्यास तर स्वस्थपणे झालाच पण त्याच बरोबरच अनेक जीवनोपयोगी कौशल्ये शिकण्याची संधी त्यांना मिळाली. जसे सहलींचे आयोजन करणे, गावागावात जाऊन लहान मुलांची शिबिरे घेणे,एकटीने एस टी बसने प्रवास करणे, लोकलचा प्रवास, लहान मुलीची काळजी घेणे, विक्री कौशल्य शिकणे इ. यामुळे त्यांचा आत्मविश्वास लक्षणीय वाढला.

* **नियमित महाविद्यालयीन तासिका**: वेल्हे, विंझर व आंबवणे अशा ३ कॉलेजमध्ये महिन्याला २ व्यक्तिमत्व विकसन तासिका याप्रमाणे यंदा १६ तासिका प्रतिभा स्वामी यांनी घेतल्या. असे कॉलेज मधल्या युवतींचे नियमित तासिका घेण्याचे हे पहिलेच वर्ष! या तासाला तीनही कॉलेजमधल्या मिळून ४० गावातील १३२ युवती होत्या. या तासिकांमध्ये भावना परिचय, आरोग्य, प्रतिभा विकसन, कल चाचणी माहिती, गटचर्चा अशी सत्रे झाली.

* **नैमित्तिक कौशल्य प्रशिक्षण वर्ग**: मार्गासनी, पारवडी, बोरावळे, सोंडे, वडगाव, विंझर, विहीर या ७ गावामधल्या बचत गटामुळे पुढे आलेल्या गाव प्रतिनिधीने गावपातळीवर युवतींसाठी वर्ग योजले. प्रतिभाताई स्वामी यांनी युवतींच्या ज्या तासिका घेतल्या त्यामुळे बाकीच्या गावांचा संपर्क झाला. या प्रशिक्षण वर्गामुळे एकूण १४ गावात कौशल्य शिकण्याची संधी मिळाली, ज्यामध्ये ३८८ युवती सहभागी झाल्या.

* **जास्वंद वर्ग**: यंदा जास्वंद वर्गाची १२ वी तुकडी आंबवणे येथे घेण्यात आली. हा वर्ग आठवड्यातून ४ दिवस ४ तास असा ३महिने चालवला. त्यात १७ युवती सहभागी होत्या. व्यक्तीविकासाची सत्रे व कौशल्य प्रशिक्षण असे प्रशिक्षण त्यांच्यासाठी योजले होते.

* **अभ्यास सहल**: या वर्षी कारले लेणी बघायला व त्या निमिताने लोकलच्या प्रवासाचा प्रथमच अनुभव घ्यायला ५ जणी जाऊन आल्या. तसेच चिंचवड येथील सायन्स पार्क बघून तेथे प्रयोग करायला १३ जणी जाऊन आल्या.

* **आरोग्य कार्यशाळा**: पौगंडावस्थेतील प्रश्नासंदर्भातील एक

कार्यशाळा पुण्यातील संवादिनी सदस्यांच्या मदतीने घेण्यात आली. वेल्हे व विंझर या कॉलेजमध्ये १२१ जणांसाठी हे मार्गदर्शन झाले. ८६ युवती व ३५ युवक उपस्थित होते.

*** तंबू शिबीर** : महिलांच्या शिबिरासोबतच युवतींचे एक रात्री मुक्कामाचे तंबूतले शिबीर विहीर या गावी झाले. यामध्ये २१ गावातून आलेल्या १०१ युवती सहभागी झाल्या होत्या. त्यात 'जीवन ज्योती' या प्रकल्पातील ३५ जणी होत्या. जीवन ज्योती हा प्रामुख्याने विविध स्वयंरोजगार कौशल्ये शिकणाऱ्या युवतींचा गट आहे. शिबिरात व्याख्याने, गाणी, गटचर्चा, पथनाट्ये सादरीकरण असा भरगच्च कार्यक्रम होता. अशा निवासी शिबिरास बहुतेक युवती प्रथमच येत होत्या. येत्या ५–१० वर्षात माझ्या गावात कुठल्या विकास कामाची गरज आहे? या विषयावर युवतींनी १०० पेक्षा जास्त मुद्द्यांची यादी केली.

*** विशेष मार्गदर्शन**: मा. भाऊ तथा वामनराव अभ्यंकर यांनी युवती विकास करताना माणसाच्या पंचकोश विकासाचा विचार केला पाहिजे असे सांगणारे मार्गदर्शन केले.युवती गटासाठी काम करणाऱ्या ८ जणी यास होत्या.

*** १० वी पुढे काय?** : किशोरी विकास उपक्रम ज्या ८ वीच्या तुकडी पासून आपण सुरु केला ती तुकडी यंदा १०वी झाली. त्यांच्यासाठी १० वी पुढे काय? हे मार्गदर्शन केले. ज्यांना पुण्यात शिकायला यायचे होते त्यांच्यासाठी कॉलेज पाहणे अशी सहल झाली. ६ कॉलेजला भेटी दिल्या व निकाला नंतर ८ जणींना प्रवेशासाठी मदत केली.१० वी नंतरच्या पुढच्या शिक्षणासाठी ४ जणींना मिळून रु. ३०,०००/– शिष्यवृत्ती दिली.

*** प्रतिज्ञा ग्रहण**: युवतींचे व्यक्तिमत्त्व समाजाभिमुख व्हावे यासाठी ही धडपड ! यंदा स्त्री शक्तीच्या कामाचे द्विदशक पूर्तीचे वर्ष, या निमित्ताने योजलेल्या प्रतिज्ञा ग्रहणाच्या कार्यक्रमात तेजश्री, वर्षा या युवतींनी व प्रतिभाताई स्वामी यांनी प्रथम प्रतिज्ञा घेतली. या प्रतिज्ञेद्वारे त्यांनी सामाजिक जाणीवेसह काम करण्याचे ठरविले.

| क्र | कौशल्य प्रकार | कालावधी | गावे | संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | वारली चित्रकला | एक दिवस | ९ | १५१ |
| २ | ओरिगामी | २ दिवस | ७ | ६५ |
| ३ | मेंदी | २ दिवस | ४ | ५० |
| ४ | कापडी पिशव्या | २ दिवस | १ | ८ |
| ५ | मणिकाम | | | |
| ६ | गणपती | ८ दिवस | २ | १० |
| ७ | आकाश कंदील | ८ दिवस | २ | ३९ |
| ८ | मॅक्रोनी | १२ दिवस | ४ | १५ |
| ९ | शिवण वर्ग | २ महिने | ३ | ५० |
| | **एकूण** | | | **३८८** |

**युवतींची नैमित्तिक कौशल्य प्रशिक्षणे**

## संधी

*** प्रशिक्षक म्हणून संधी**: विंझर मधील कॉलेजच्या ६५ मुलींना व निगडी येथील प्रबोधिनीच्या शाळेतील ३५ विद्यार्थ्यांना ओरिगामी शिकवण्याची संधी तसेच जीवन ज्योती आंबवणे येथील ४२ जणींना मणीकाम शिकवण्याची संधी यंदा युवती गटाने घेतली. आपल्याला येत असणारे कौशल्य इतरांना शिकवायचे तर त्या विशिष्ट कौशल्या बरोबरच शिकविण्याचे कौशल्यही यावे लागते, हा अनुभव त्यांनी घेतला. या अनुभवामुळे आता ५–६ जणींचा गट प्रशिक्षक म्हणून चांगला तयार झाला.

*** वारीमध्ये सहभाग** : यंदा ८ जणींचा गट आळंदी ते पुणे असा वारीमध्ये सहभागी झाला होता.

*** रामकृष्ण मठ**ामध्ये भारत भरातल्या युवतींसाठी योजलेल्या ३ दिवसांच्या निवासी शिबिरात ८ जणी सहभागी झाल्या होत्या. हे शिबीर व्यक्तिविकासासाठी होते. त्यात माहितीपर व्याख्याना–शिवाय ध्यान व खेळही होते.

*** स्वतःच्या पायावर** उभे राहाण्यासाठी २ युवतींना विभागात काम करण्याची संधी दिली. आपण स्वतः कमवूनही शिकू शकतो याचे उदाहरण घालून देण्याचा हा प्रयत्न आहे.

*** विक्री करण्याचा अनुभव** : आपल्याला येत असणारी गोष्ट विक्रीयोग्य बनवणे व प्रत्यक्ष स्टॉल वर उभे राहून आपल्या मालाची न संकोचता विक्री करणे असा अनुभव घेण्यासाठी वर्षभरात ३ वेळा यात्रा व मेळाव्यात युवतीना संधी दिली. त्यात त्यांच्या उत्पादनाची ३५००/– रुपयांची विक्री झाली. तसेच त्यांनी ओरीगामीच्या वस्तू बनवून दिल्या व दिवाळीसाठी मण्याचे १२५ आकाशकंदील विक्रीसाठी बनवून दिले. त्यातून २०००/–रुपयांची करणावळ मिळवली. या अनुभवांमुळे गरज पडल्यास माझं मी कमवू शकीन, असा विश्वास युवतीना आला.

*** गाववार मेळावे आयोजन**: एप्रिल–मे महिन्यात वैज्ञानिक प्रयोग दाखवण्यासाठी गाववार मेळावे घेण्यात आले. मेळावे घेण्यापूर्वी मेळावे कसे घ्यायचे? याचे प्रशिक्षण२६ युवतींनी घेतले. त्यापैकी १६ युवती मेळावे घेण्यास ३८ गावात गेल्या. प्रशिक्षणामुळे अनोळखी गावात जाऊन सुद्धा मुला–मुलींशी त्या बोलू शकल्या व प्रशिक्षणात शिकवलेले प्रयोग दाखवू शकल्या हे विशेष. या मेळाव्यास सर्व गावातील एकूण २५० युवतीही सहभागी झाल्या होत्या.

*** क्रीडा प्रात्यक्षिके सहभाग**: या वर्षी क्रीडा प्रात्यक्षिके झाली. याच्या सरावा पासून सादरीकरणा पर्यंत १४ युवतींनी जबाबदारी घेऊन काम केले. या प्रसंगी आत्मविश्वासाने जबाबदारी घेऊन केलेले आपापल्या गटाचे सादरीकरण करताना युवतींमध्ये झालेला विधायक बदल प्रेक्षकांना जाणवणारा होता.

*****

# बालवाडी

गेली २ वर्षं ज्ञान प्रबोधिनीच्या वतीने, दुर्गम ग्रामीण भागातील वाडीवस्तीवर, पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी बालवाडी हा विषय आपण हाताळत आहोत. आपल्या या बालवाड्या वस्तीवर आहेत. या सगळ्या वस्त्या गावापासून थोड्या लांब असल्यामुळे ३ ते ५ वयोगटातील बालके आपापली चालत गावातल्या बालवाडी पर्यंत जाऊ शकत नाहीत, त्यामुळे ती पूर्व प्राथमिक शिक्षणापासून वंचित रहातात. असे होऊ नये म्हणून आपण बालवाड्या चालवतो. या बालवाड्यांना प्रशिक्षित शिक्षक असावा म्हणून स्थानिक शिक्षिकांचे दरमहा नियमित प्रशिक्षण चालू आहे. या प्रशिक्षणात बालकांचे इंद्रिय विकसन व्हावे यासाठी रंजक, कल्पक खेळ घेण्यावर भर दिला जातो. बालवाडी शिक्षिका प्रशिक्षणात शिकवलेले तसे हसत-खेळत शिक्षण बालवाडीत चालू आहे ना ? हे पहायला नियमित बालवाडी भेटी दिल्या जातात. अशा प्रकारच्या गोडी वाढवणाऱ्या शिक्षणाने पूर्वी बालक शाळेत गेले कि बाराखडी यायला हवी असा पालकांचा हट्ट असयचा, आता पालक बैठकीत बोलून बोलून हा हट्ट कमी व्हायला लागला आहे.

| क्र | गाव | संख्या | क्र | गाव | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | कुसगाव वस्ती | १७ | ५ | रायदंडवाडी | १० |
| २ | जाधववाडी | ९ | ६ | देवपाल | १२ |
| ३ | माजगाव | १२ | ७ | सणसवाडी | ९ |
| ४ | गेळगाणे | ११ | | **एकूण** | ८० |

**बालवाडी तपशील**

**✻ शिक्षक प्रशिक्षणातील आशय:**

**भाषा विकास:** शब्द संग्रह वाढवणे, लेखन वाचन पूर्व तयारी.

**गणित:** सांख्यिकी संकल्पना, आकार व आकृती ओळख.

**इंद्रिय विकास:** हस्त/मुक्त व्यवसाय, खेळ, विज्ञान प्रयोग.

यासाठी पाठाला लागणारे साहित्य निर्मिती दर महिन्याच्या प्रशिक्षणात करून घेतली जाते.

**बालवाडी उपक्रम:**

**✻ पालकसभा:** २०१५-१६ या वर्षात गाववार एकूण ८ पालक सभा झाल्या. ६०% पालक त्या सभेस उपस्थित असतात. या वर्षी बाबा पालकांच्या उपस्थितीचे प्रमाण चांगले होते.

**✻ आरोग्य तपासणी:** जून ते ऑगस्ट दरम्यान ८ बालवाडीतील ६१ मुलांची तपासणी वैद्य मानिषाताई यांनी केली. यात रायदंडवाडी मध्ये २ तीव्र व बरीच सौम्य कुपोषित निघाली. त्यानंतर या मुलांना १०० दिवस जास्तीचा सकस आहार दिला. त्यामुळे मुलांचे वजन वाढले.

**✻ क्रीडा प्रात्यक्षिकात सहभाग:** या वर्षी कामाच्या द्विदशकपूर्ती निमित्त जी प्रात्याक्षिके केली, त्यात या बालकांचा सहभाग होता. सुरुवातीला लोळणे, सशाच्या उड्या, बेडूक उड्या, लंगडी अशी काही प्रात्यक्षिके त्यांनी बालवाडीत सराव करून १० मिनिटे सादर केली. यासाठी त्यांनी दीड-दोन तासांचा प्रवास केला. बालकांसोबत आई पालक आल्या होत्या.

**✻ आषाढी दिंडी:** आषाढी निमित्ताने प्रत्येक बालवाडी पासून गावातल्या देवळापर्यंत अशा छोट्याशा दिंडीचे आयोजन केले होते. त्यानंतर देवळात भजन घेतले. या कार्यक्रमाचे गावकऱ्यांनी तोंड भरून कौतुक केले.

**✻ सहल:** गावपातळीवर बालकांची पायी सहल काढली. हा उपक्रम डिसें-जाने च्या थंडीत घेतला त्या निमित्ताने बालकांनी निसर्गाशी जवळीक साधली.

**✻ २६ जानेवारी:** बालकांनी १० जानेवारीच्या प्रात्यक्षिकात सहभाग घेतल्यामुळे तयारी झालेली होतीच. ती पाहून माजगाव व जाधववाडी येथे ग्रामस्थांनी मुलांना झेंडावंदनानंतर पुन्हा गावासमोर प्रात्यक्षिके करायला लावली व गावातल्याच जिल्हा परिषदेच्या मोठ्या शाळेत या बालकांनी आपला ठसा उमटवला.

**शिक्षकांसाठी उपक्रम:**

बालवाडीचा गावातला वर्ग घेणे हे महत्त्वाचे पण त्या बरोबरच व्यक्ती म्हणून शिक्षकांच्या क्षमतांचा विकास झाला पाहिजे हे जाणून शिक्षकांसाठी विशेष कृतीची योजना केली होती, ती पुढील प्रमाणेः-

**✻ क्रीडा प्रात्यक्षिका**तील सहभाग! मुलांचा सहभाग होता तसाच ६ बालवाडी ताईंनी स्वतः तयारी करून प्रात्यक्षिकात लेझिम सादर केले.

**✻ विक्री उपक्रमात सहभागः** स्वयंरोजगाराची माहिती व्हावी म्हणून बचत गट उत्पादित वस्तू **विक्री उपक्रमात त्यांनी सहभाग** घ्यावा अशी संधी दिली. ६ जणींनी या संधीचा लाभ घेतला. वेल्हे, शिवापूर व आंबवणे येथे स्टॉलवर वस्तू विक्री करण्याचा अनुभव त्यांनी घेतला.

**✻ स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांचं यजमान होणं:** दरवर्षी २४ते२६ जानेवारीला आपल्या स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थी गावोगाव महिला ग्रामसभा व्हावी या उद्देशाने तसेच त्या गावाचा अभ्यास करण्यासाठी येतात. यंदा ५ गावात आपल्या बालवाडी ताई यांनी त्याचं यजमानपद घेतलं.या निमित्ताने काही गावात महिला ग्रामसभा झाल्या. यामुळे ग्रामसभेने यांच्या कामाची दखल घेतली.

**✻ सहल:** दुर्गम गावातील आपल्या बालवाडी ताई कधीही स्वतःसाठी घराबाहेर पडत नाहीत. मनाला प्रसन्नता यावी व ताण कमी व्हावा म्हणून त्यांची प्रतापगडावर सहल आयोजित केली होती. या सहलीला बालवाडी ताई, प्रशिक्षिका तसेच हिरकणी प्रशिक्षिका अशा १५ जणी आल्या होत्या. घरापासून थोडेसे लांब, मैत्रिणीच्या सोबत असा छान उत्साहवर्धक प्रवास झाला. सर्वजणी प्रथमच घराबाहेर पडल्या होत्या.

* **तंबू शिबिरात सहभाग**: बचत गटाच्या महिलांच्या शिबिरात ३ बालवाडीताई प्रथमच सहभागी झाल्या होत्या. गावोगावच्या नेतृत्व करणाऱ्या सदस्या त्यांनी पाहिल्या आणि स्वतःचा प्रवास कसा करायचा आहे याचा विचार त्यांच्या मनात सुरू झाला.

* **किशोरी विकास मेळावे**: किशोरींना एकत्र करून एक दिवसाचे गाववार मेळावे घेण्याचे काम दुपारी बालवाडी ताई यांनी केले.

* **विविध व्यक्तींच्या भेटी**: झारखंड येथील २० जणांच्या गटाने, विकासाची प्रतिनिधी म्हणून बालवाडी ताई कशी काम करते असे सांगणारी मनोगते ऐकली. अश्विनीताई लेले यांनी देवपाल येथे चालणाऱ्या बालवाडीला सहकुटुंब भेट दिली व साहित्य खरेदीला देणगी दिली. कालिकाताई जोशी यांनीही बालवाडीला भेट देऊन शैक्षणिक साधने दिली.

*****

# हिरकणी

हिरकणी वयोगट म्हणजे बालसंगोपन हेच जिचे मुख्य काम आहे अशा मातेचे प्रशिक्षण. ० ते ६ वयोगटातील मुलांचा विकास कसा होतो, हे त्यांच्या आयांनी जाणीवपूर्वक समजून घ्यावे आणि त्यांच्या घरात उपलब्ध असलेल्या साधनांच्या साह्याने डोळसपणे मुलांच्या वाढीकरिता काही उपक्रम करावेत असा या प्रशिक्षणाचा हेतू. त्यात मुलांसाठी स्नायू विकास, इंद्रिय विकास व भाषा विकासाचे छोटे-मोठे खेळ आईने शिकून घ्यायचे असतात. आईने केवळ घरकामाला महत्व देऊ नये तर मुलाच्या वाढी बरोबरच विकासालाही महत्त्व द्यायचे म्हणजे हिरकणी बनायचे!

यासाठी कृतिपूर्ण अभ्यासक्रम तयार केला आहे. हा अभ्यासक्रम महिन्यातून एकदा असे ६ महिने एका वेळी अडीच तास शिकायचे अशी योजना माता पालिका प्रशिक्षणाची केली. हा प्राथमिक अभ्यासक्रम साधारण १५ तासाचा आखला. या प्रशिक्षणानंतर मातांनी प्रशिक्षणातले प्रयोग मुलासोबत घरी, त्यातही स्वयंपाकघरात करावेत, यासाठी गृहपाठ दिला जातो. त्याचा आढावा पुढील सत्रात घेतला जातो, ज्यामुळे कृती करताना आलेल्या अडचणी लक्षात येतात नि कृतीचे महत्त्व मातेला पुन्हा एकदा पटते. मुलांची पंचज्ञानेंद्रिये विकसित होतील यासाठी स्थानिक साधने वापरून कोणत्या कृती केल्या पाहिजेत याविषयी चर्चा होते. या प्रशिक्षणाचा लाभ ८ गावातील १०६ मातांनी घेतला.

**'हिरकणी' प्रशिक्षणे**

| क्र | गावे | माता | क्र | गावे | माता |
|---|---|---|---|---|---|
| १ | पारवडी | २० | २ | देवपाल,सणसवाडी | १९ |
| ३ | करंजावणे | १३ | ४ | रांझे | ९ |
| ५ | दिघेआळी | १३ | ६ | वाजेघर | १० |
| ७ | वडगाव झांजे | ११ | ८ | घिसर | १३ |
| **एकूण गावे** | **८** | **माता** | **१०८** | | |

**मेळाव्यात सहभाग**: बचत गटाचे गावोगावी काम सुरु आहे. त्याचे वार्षिक मेळावे होत असतात. या संक्रांत, नवरात्र मेळाव्यात हिरकणी प्रकल्पाची माहिती दिली जाते व ज्या गावातून स्थानिक कार्यकर्ती गावातील मातांना एकत्र करेल अशा गावात हिरकणी सुरु केली जाते. यासाठी कधी शासकीय अंगणवाडीच्या ताईला माता पालिका बैठक घ्यायचीच असते म्हणून त्या सुद्धा पुढाकार घेतात.ऑक्टोबर २०१५ मध्ये ७ गावात नवरात्र मेळावे झाले त्यात १० जणी मेळाव्यासाठी गेल्या होत्या. या मेळाव्यास ज्यांनी हिरकणी म्हणून स्वतः प्रशिक्षण घेतले व मुलासोबत कृती केली अशा यशस्वी उत्साही ६ हिरकणी व ४ प्रशिक्षिका होत्या. या निमिताने १०० महिलांपर्यंत पोचणे झाले. त्यातून ८ गावात ६ महिने चालणारी स्थिर सत्रे सुरु झाली. याचा कालावधी नोव्हेंबर ते एप्रिल असा होता. एकूण १०० महिला यात सहभागी झाल्या. या नवीन गावातून ४ हिरकणी प्रशिक्षिका तयार झाल्या ज्या पुढच्या गावांना जायला तयार झाल्या.

* **हिरकणी प्रशिक्षका बैठकः** दरमहा तिसऱ्या गुरुवारी प्रशिक्षकांची आंबवणे येथे या सगळ्यांची बैठक होते. जूनमध्ये जीवन ज्योती, आंबवणे येथे आजी-माजी हिरकणींचा मेळावा झाला. याला ६ गावातल्या ४० जणी उपस्थित होत्या.

* **बोलक्या बाहुल्यांचे प्रशिक्षणः** जुलै २०१५ मध्ये अंगणवाडी ताई यांचा मेळावा घेऊन सुरेखाताई दिक्षित, पुणे यांनी बोलक्या बाहुल्यांचे प्रशिक्षण दिले. त्यात हिरकणीची माहिती दिली. हिरकणी प्रकल्प गावागावात व्हायला हवा अशी मागणी त्यातून आली.

* **स्वाधार केंद्र भेट**: स्वाधार केंद्र अशाच प्रकारचे काम पुण्यातल्या वस्त्यांमधून करते. ते पहाण्यासाठी ७ हिरकणी आणि प्रशिक्षिकांनी त्यांच्या कामास भेट दिली.

* **इतर संधी**: बचत गट सदस्यांसोबत परिचय वाढवला. परिणाम म्हणून २ हिरकणी उत्पादन करून गटासोबत उत्पादन विक्री मध्ये सहभागी झाल्या. तंबू शिबिरात ४ जणी सहभागी झाल्या तर ५ गाव पातळीवरील किशोरी मेळाव्यात काही सहभागी झाल्या हे विशेष!

*****

**✽ पुढील देणगीदारांनी रु. १०,०००/-पेक्षा जास्ती रक्कम मागील वर्षात दिली** :- आशिष लेले,संजीव गोखले,बळवंत मराठे, के. एम. शेलगीकर, मिलिंद संत, सतीश मराठे,काका हलवाई, विलास तडवे, डॉ. के. एन. शेंडगीकर, मुकुंद साने, राधा मुकुंद संगमनेरकर, डॉ. संजीव शरदचंद्र गोखले, पी. एन. जी, पराग गाडगीळ, हसमुख पटेल, विलास जावडेकर, मांडके हिअरिंग सर्विसेस, निरुपमा मोडक, अरविंद शहा,अडॉप्ट,शारदा अलायन्स,विलास जावळकर

✽ वरील देणगीदारांशिवाय आणखी ९८ देणगीदारांनी मिळून कामासाठी १३ लक्ष ८० हजार रुपयांची देणगी उभी केली.

# बचत गट

१९९५ पासून बचत गटाचे काम भोर, वेल्हे, हवेली या तीन तालुक्यात सुरु आहे. आता १५-२० वर्षं बचत गटाचे सभासद म्हणून फायदा घेणाऱ्या हायवे जवळच्या गावातल्या महिलांना बचत गटाचे महत्त्व पटले आहे. पंचवीस रुपयांपासून सुरु झालेले हे गट आता दरमहा दर सभासद दोन-पाचशे रुपयांची बचत करायला शिकले. अपवादाने काही बचत गटातल्या महिला तर दरमहा एक हजार रुपये बचत भरू लागल्या आहेत. या वर्षीच्या गटाच्या कामाची आकडेवारी पुढील प्रमाणे:

या वर्षी ४७ गावातून ३०४ बचत गट चालवण्याची रचना केली, ज्यामध्ये ५१६४ महिला सभासद सहभागी झाल्या. हे सगळे गट मिळून दर महिन्याला १०.२५ लाख रुपये बचत करतात. या मुळे असे निश्चित म्हणता येईल कि बचत गटाने महिलांना बचत करण्याची चांगली सवय लागली आहे.

| क्र | तालुके | गावे | गट | सभासद |
|---|---|---|---|---|
| १ | वेल्हे | २४ | ८२ | १३३६ |
| २ | भोर | १४ | १०९ | १६७८ |
| ३ | हवेली | ९ | ११३ | २१५० |
| | एकूण | ४७ | ३०४ | ५१६४ |

या वर्षी २२६ गटांचा हिशोब गाववार सांगितला. एकूण ३०४ गटांपैकी दुर्गम गावातील गाववार हिशोबाचे मेळावे होण्याची रचना हळूहळू बसते आहे. एकूण २२६ गटांचा हिशोब या वर्षी होऊ शकला. त्याचे तपशील खालील तक्त्यात दिले आहेत. या गटांनी २.४३ कोटी रुपये बचत केली तर आज पर्यंत ६.७० कोटी रुपये कर्ज घेतले, त्यापैकी २.४९ फेडले ४.२१ कोटी रुपये देणे बाकी आहे. या व्यवहारात या गटांत आज पर्यंत जवळ जवळ एक कोटी रुपये व्याज जमा झाले आहे. ३७ बचत गटांमध्ये अंतर्गत कर्ज वाटप १% दराने केले जाते, बाकी सर्व गट २% दराने कर्ज वाटप करतात. जर गट नसते तर हाच व्याजदर ५-१०% महिन्याला पडला असता. त्यामुळे जी कामे तातडीची होती तेवढीच फक्त झाली असती, त्या ऐवजी गरजेला पैसे मिळतात म्हणून महिलांची अनेक कामे बचत गटाच्या हक्काच्या कर्जामुळे झाली, हे विशेष नोंदवावेसे वाटते.

*** हिशोब मेळावे व त्यात द्विदशकपूर्ती महामेळाव्याची पूर्वतयारी:** एप्रिल २०१५ या महिन्यामध्ये प्रत्येक गट सुरु झाल्या पासून ३१ मार्च २०१५ अखेर पर्यंतचे हिशोब सांगणारे मेळावे गावागावात जाऊन घेतले. असे मेळावे ९ गावात झाले. मेळाव्यांना २४५ महिला उपस्थित होत्या. गटात येणाऱ्या अडचणी या मेळाव्यात मांडल्या गेल्या. एप्रिलमध्ये योजलेल्या द्विदशक पूर्ती मेळाव्याचे नियोजनही या गावोगावच्या मेळाव्यात केले. काही गावांनी भव्य मेळाव्याला जाण्यासाठी गटातून खर्च काढून सभासदांसाठी जीप ठरवली तर काहींनी भरपूर सभासद येणार म्हणून चक्क वऱ्हाडाला ठरवतात तसा ट्रक ठरवला. काहींनी मेळाव्यासाठी जेवण करायचे त्यासाठी धान्य, भाजी दिली तर कोणी कार्यालयाची परवानगी काढली. या वार्षिक हिशोब मेळाव्यात गाववार असा सारा तपशील ठरला. परिणाम म्हणून ४५०० ग्रामीण महिलांची भरघोस उपस्थिती असणारा भव्य मेळावा १८ एप्रिल २०१५ला शिवराई मंगल कार्यालय, शिवरे येथे संपन्न झाला.

*** बचत गट बँक जोडणीचा नाबार्डचा ॲड ऑन प्रकल्प:** या नाबार्डच्या प्रकल्पाअंतर्गत एकूण १५० गट बँक लिंक करायचे होते. सन २०१५-१६ मध्ये त्यापैकी ९५ बचत गट बँक लिंक केले. लिंक केले म्हणजे त्या गटांची खाती बँकेत काढून त्यांना रु. १,४०,९०,०००/- एवढे कर्ज मिळवून दिले. यासाठी ९५ गटाच्या प्रत्येक सभासदाने सही केली आहे असा अर्ज तयार करून बँकेत दिला. पुण्याच्या विजया बँकेने ९३ गटांसाठी त्यासाठी पुढाकार घेतला तर जनता बँक भोर यांनी २ गटांना कर्ज दिले. संबंधित अधिकाऱ्यांना त्या त्या गावात नेऊन त्यांची गाव भेट घडवून आणली. कर्ज मंजूर झाल्यावर प्रत्येक गटाच्या ३ प्रमुखांना म्हणजे वर्षाभरात एकूण २८५ जणींना टप्प्याटप्प्यात बँकेत नेऊन कर्ज काढायला शिकवले व गावात जाऊन गटाची बैठक घेऊन

| क्र | सभासदाची मासिक बचत | गट |
|---|---|---|
| १ | २०/- | ३ |
| २ | ५०/- | ७ |
| ३ | १००/- | १४२ |
| ४ | २००/- | ९६ |
| ५ | ५००/- | ४६ |
| ६ | १०००/- | १० |

| क्र | गावाचे नाव | गट | बचत | कर्ज | येणेबाकी | व्याज |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गाऊडदरा | २१ | ४६,२२,२०० | १,१६,५८,४८० | ७८,६२,६४० | २०,९९,६०४ |
| २ | शिवापूर | ३१ | ५१,०४,४०० | १,४३,००,९२१ | ७९,०५,५१० | २०,५७,२४७ |
| ३ | श्रीरामनगर | २० | ३०,७२,००० | ९१,४३,९७८ | ५३,०६,८१८ | ९,९४,६७७ |
| ४ | शिवरे | ३१ | ३०,०८,७०० | ८३,०९,४९३ | ५१,०३,७८२ | १३,०१,३३३ |
| ५ | खोपी | १८ | १४,५९,७०० | ५३,२९,५०० | ३७,१७,८८८ | ९,९०,०६८ |
| ६ | आंबवणे | ३१ | ९,९८,६०० | २९,७८,३९७ | १५,५६,१७९ | ४,१७,५९० |
| ७ | रहाटवडे | १४ | १२,४३,६०० | २३,१३,२०२ | १४,२९,६४९ | २,९२,१६४ |
| ८ | कुसगाव | १० | ५,५४,९३१ | १९,८४,५८९ | ९,९७,३११ | २,०९,५५१ |
| ९ | सांगावी | २२ | ६,२३,८५० | २७,८४,५६३ | २२,८८,९२० | २,५६,६५० |
| १० | रांझे | १९ | २०,११,००० | ४८,७१,२८० | २७,६०,४१७ | ३,५८,७०४ |
| ११ | वेल्हे | ९ | १६,४४,५४० | ३३,५८,१७२ | १९,००,८२० | ८,२९,१५८ |

**मार्च २०१६ अखेर गाववार हिशोब मेळावे २२६ गटांचे झाले. त्याचा तपशील सांगणारा तक्ता**

सभासदाला कर्ज वाटप करायला शिकवले. या प्रक्रियेत पैशाची जोखीम घेण्याचे व हिशोब नोंदवण्याचे प्रशिक्षण गट प्रमुखांचे झाले. जवळ जवळ १७० गटप्रमुख या निमिताने पहिल्यांदाच बँकेत गेल्या. दिवाळीच्या लक्ष्मी पूजनालाही कार्यकर्त्यांनी सुट्टी न घेता गावोगावच्या लक्ष्म्यांना 'लक्ष्मी' मिळेल असे पाहिले.

**बचत गटांची रचना:**

**✻ गटः** गावात महिला ठराविक दिवशी एकत्र जमून बचत करतात, जमलेल्या पैशातून त्याच गटातली कोणी जिला गरज असते ती कर्ज घेते. असे बचत गट पुढे 'विभागाला' जोडलेले असतात.

**✻ विभागः** विभाग म्हणजे १०-२० बचत गटांचा गट. या विभागात प्रत्येक गट दरमहा १००रु बचत करतो नि २०/-रु गट व्यवस्थापनाचा खर्च देतो. एकेका विभागात सरासरी २५ गट असतात. या विभागातील व्यवहाराच्या सगळ्या आर्थिक नोंदी असणारे, विभागाचे पासबुक प्रत्येक गटाला दिले जाते. असे **या वर्षी १० विभाग आपण चालवले.** विभाग चालवायची कल्पना आपण २००८ पासून राबवली. आता **शिवापूर भागातली विभागाची महिन्याची आर्थिक उलाढाल २ ते २.५० लाखापर्यंत** असते. गावपातळीवर निर्णय करणारा महिलांचा गट या विभागात बघायला मिळतो. गावासाठी उपयुक्त कामे या विभाग रचनेमुळे अधिक सोपी झाली.

**✻ विभागांचे केंद्र बनतेः** गटाचा जसा विभाग होतो तसे विभागाचे पुढे केंद्र बनते. केंद्र म्हणजे विभागांचा गट! केंद्रात प्रत्येक विभागाचे खाते काढलेले असते. विभागाला कर्ज हवे असल्यास केंद्रातून मिळते तसेच विभागाची शिल्लकही केंद्रात जमा करता येते. या बैठकीत कर्ज देणे, परतफेड जमा करणे असे व्यवहार होतात. या उलाढालीच्या काही % रक्कम विभाग सेवा खर्च या नावाने विभाग केंद्रात जमा करतो.

**✻ स्थानिक महिलांच्या नेतृत्वाने चालणारे जिजामाता प्रबोधन केंद्रः** दर २२ तारखेला केंद्राची बैठक शिवापूरला होते. त्यात विभागात झालेल्या कामांची निवेदने होतात. त्यामुळे आजूबाजूच्या गावात महिला पुढाकाराने काय काम चालते हे इतर गावात कळते. ही घडी बसवताना **स्थानिक महिलांचे सक्षमीकरण** होईल असे जाणीवपूर्वक बघितले आहे. या भूमिकेमुळे आजपर्यंत कुठलाही प्रकल्प राबवण्यासाठी कोणी स्वतंत्र, जास्त शिकलेली, स्थानिक नसणारी व्यक्ती नेमली नाही. त्यामुळे **स्थानिक पुढारपण करणाऱ्या महिलांचे अनुभवातून येणारे शहाणपण वाढत गेलेले दिसते.** अशा सक्षम गटातून आता जिजामाता प्रबोधन केंद्र ही स्वतंत्र नोंदणी असलेली संस्था स्थापन झाली. या संस्थेचे हे ८वे वर्ष!

**✻ जिजामाता प्रबोधन केंद्र सदस्य प्रशिक्षणः** दर महिन्याच्या २२ तारखेला जिजामाता प्रबोधन केंद्राची बैठक असते. डिसेंबर १५ पासून या बैठकीनंतर सर्व सदस्यांसाठी आर्थिक साक्षरता प्रशिक्षणाची रचना केली. त्यात पुढील विषय घेण्यात आले.

देशाचे,घराचे,गावाचे बजेट याचा अभ्यास गटाने केला. इन्शुरन्स कशासाठी-कुणासाठी-कधी? यावरही तपशीलात माहिती देणारे प्रशिक्षण झाले. इन्शुरन्स विषयी किती गैरसमज असतात हे या प्रशिक्षणात लक्षात आले. म्हणून इन्शुरन्स व बजेट या विषयांवर भरपूर प्रश्नांमुळे ते सत्र खूप रंगले हे विशेष!

आंबवणे येथील विभागात नव्याने सुरु झालेल्या गटांची संख्या जास्त असल्यामुळे सभासद पुस्तक लिहिणे, लेजर लिहिणे अशी प्रशिक्षणे घेतली. नोंदी चोख ठेवण्याचे महत्त्व या प्रशिक्षणांमधून अधोरेखित केले. शिवगंगा गुंजवणी खोऱ्यातले जिजामाता प्रबोधन केंद्राचे काम आवश्यकतेनुसार ज्ञान प्रबोधिनीच्या मार्गदर्शनाने होते. वर्षभर या वर उल्लेखलेल्या सगळ्या कामासाठी ६० गावातल्या ८७ जणींनी मदत केली.

**✻ स्त्री प्रधान कुटुंब मेळावा:** बचत गटामुळे महिलांसंबंधी काम करताना महिलांच्या बऱ्याच अडचणी लक्षात येतात. त्यातही ज्या कुटुंबाचा आधारच महिला आहे, काही कारणाने फक्त तीच जर घर चालवत असेल तर तिला येणाऱ्या अडचणी वेगळ्या असतात. या अडचणीत काही समानता लक्षात येते का? अशा कुटुंबप्रमुख महिलांना एकाकी पडल्यामुळे केंद्र काही मदत करु शकेल का? असे बघण्यासाठी ८ मार्च महिला दिनानिमित्त त्यांचा मेळावा घेतला. त्याला ५ गावातून ३५ जणी आल्या होत्या. त्यांच्या मुलांसाठी शिक्षणाला मदत हवी हा मुद्दा त्यानिमिताने लक्षात आला. येत्या वर्षात अशी मदत नक्की करायचे ठरले.

सरकारने आवाहन केलेल्या जनधन योजनेत खाती काढण्याचे महत्त्व महिलांना सांगून, महिला खाती काढतील असे पाहिले. ४०० पेक्षा जास्त महिलांनी या निमिताने बँकेत स्वतःची खाती काढली. *****

## स्वयंरोजगार

ग्रामीण महिलेला बचतीची सवय लागली. दरमहाची तिची बचत आता २० लक्ष रुपयांपर्यंत गेली. पैसा वाढावा म्हणून तो उत्पादक गोष्टींमध्ये फिरवला पाहिजे, हे अजून तिला शिकायचे आहे, त्यासाठी तो कसा योग्य प्रकारे वापरता येईल, हे तिच्या प्रशिक्षिकांनाही शिकायचे आहे. उत्पादक उपक्रमात गुंतवण्याबरोबरच तो, स्वयंरोजगाराच्या उपक्रमांमध्येही फिरवावा लागेल, हे सुद्धा ती शिकते आहे. त्यासाठी तिला प्रशिक्षणाची, प्रयोग करण्याच्या संधीची, विक्रीच्या कौशल्यांची, छोट्या उद्योगातील काही तंत्र आणि मंत्र शिकण्याची गरज आहे. याच बरोबर 'तू पुढे हो', 'तू बरोबर आहेस', 'या मार्गाने तुला तुझ्या संसारासाठी नक्की काही रक्कम उभी करता येईल', असे तिला विश्वासात घेऊन कोणीतरी सांगण्याचीही गरज आहे.

तिच्या संसाराला लागणारा पैसा बचतीच्या पैशातून निर्माण व्हावा, म्हणून वरील सर्व कामे तिच्यासाठी स्वयंरोजगार विभागातर्फे केली जातात. अशा कामांमध्ये स्वयंरोजगार कौशल्य प्रशिक्षणापासून प्रत्यक्ष एखादा छोटा उद्योग उभा करण्यापर्यंत सर्व कामे येतात.

गेल्या २० वर्षांमध्ये १०० गावांमधील २५०० महिलांचे

५० स्वयंरोजगार कौशल्यांविषयीचे प्रशिक्षण झाले. त्यातील त्यांचे या वर्षीचे तपशील पुढील प्रमाणेः–

**स्वयंरोजगार प्रशिक्षणे**:

*** राम–सीता पुराणिक तंत्र निकेतनः –** ग्रामीण भागातील महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे, किंवा किमान स्वतःचा काही खर्च तरी स्वतः कमवून उभा करावा, त्यासाठी छोटासा का होईना, उद्योग करावा असा प्रयत्न राम सीता पुराणिक तंत्र निकेतन करते. तंत्र निकेतना मार्फत महिला तंत्र प्रशिक्षणाला प्राध्यान्य दिले जाते. यात आजवर शिवण, लोकरकाम, जर्दोसी, मेंदीवर्ग, भरतकाम, ग्लास पेंटिंग, फॅशन डिझायनिंग यासारख्या १०० विविध कौशल्यांचे वर्ग १६०० महिलांसाठी घेण्यात आले.

या वर्षी राम सीता पुराणिक तंत्र निकेतनाच्या शिवापूर येथील स्थिर वर्गा बरोबरच गावोगावी, गावपातळीवर असे वर्ग झाले. दोन्ही वर्गांत मिळून या वर्षी एकूण१२३ जणींचे प्रशिक्षण झाले. यात ३ जणींना नव्याने प्रशिक्षक म्हणून काम करायची संधी मिळाली.

*** उद्योग मार्गदर्शन** : या वर्षी कुसगाव येथे दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणावर करण्यासाठी माहिती दिली. यात मुख्यतः राष्ट्रीय कृत बँकेकडून वैयक्तिक कर्ज कसे मिळवायचे या संदर्भात मार्गदर्शन केले. त्या निमित्ताने पुण्यातील विजया बँकेच्या अधिकाऱ्यांची कुसगावात बैठक घेऊन इच्छुक उद्योजकांच्या जागेची पहाणी करण्यास अधिकाऱ्यांना मदत केली.

गावपातळीवर वैयक्तिकपणे चालणाऱ्या दुग्ध व्यवसायास जर राष्ट्रीयकृत बँकांचे कर्ज मिळू शकले, तर त्याचा आवाका वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना मदत मिळू शकते. यासाठी स्वयंरोजगार विभागाने वरील मदत शेतकऱ्यांना केली.

*** प्रदर्शन भरवणे** : शिवापूर व आंबवणे या गावात नवीन उद्योजिकांना उद्योग संधी लक्षात येण्यासाठी त्यांनी केलेल्या उत्पादनांचे प्रदर्शन भरवले. या प्रदर्शनात शिवापुरात२१ तर आंबवण्यात २६ असे एकूण ४७ महिलांनी स्टॉल्स लावले. त्यात २५ गावातल्या उद्योजिका सहभागी झाल्या होत्या तर ३७५ पेक्षा जास्त जणांनी या प्रदर्शनास भेट दिली. आंबवण्याच्या प्रदर्शनाला गट विकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, विस्ताराधिकारी यांनी भेट दिली तर शिवापुरच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन सरपंचांच्या हस्ते झाले. दोन्ही मिळून रू. २६,०००/– पेक्षा जास्त विक्री झाली.

अशा प्रदर्शनातील सहभागामुळे महिलांना उत्पादनासंदर्भातील माहिती लोकांना सांगण्याची सवय लागते. खरेदीसाठी येणाऱ्या गिऱ्हाईकाच्या अपेक्षा काय असतात, त्यांच्या प्रश्नांना कशी उत्तरे द्यायची, त्यातून आपल्या उत्पादनात कसे आवश्यक ते बदल करायचे यासंदर्भात त्यांचे विचार सुरू होतात.

**वृत्त काळात झालेली उत्पादन विक्री**

| क्र | | सहभागी | कालावधी | रुपये विक्री |
|---|---|---|---|---|
| १ | शिवण | ४ | १ महिना | ३,४८४/– |
| २ | वाख | ३ | ३ महिने | ६,७३९/– |
| ३ | लोकरकाम | ७ | ३ महिने | १०,५००/– |
| ४ | अन्य उत्पादनांची विक्री | | एक वर्ष | २,१०,०००/– |
| | | | | २,३०,७२३/– |

*** विक्री साहाय्य**: बचत गटातील महिलांनी बनवलेल्या उत्पादनाच्या विक्रीस सुरुवातीला हातभार लागला तर महिला उद्योजक बनण्याची शक्यता अधिक असते हे लक्षात घेऊन आपण वर्षभरात त्यांना स्टॉल वर संधी दिली, तसेच वैयक्तिक विक्री साठी मदत केली. कधी नेमके भांडवल पुरवले तर कधी संपर्क, कधी संधी दिली तर कधी ऑर्डर मिळवून दिली कधी प्रबोधिनीच्या नावाने स्टॉल लावला तर कधी स्टॉल लावणाऱ्यांना माल पुरवला. आपल्या पारंपरिक खेळ करणाऱ्या गटाने यंदा ४ ठिकाणी प्रात्यक्षिके केली. त्यातले एक पुण्यात भरलेल्या राज्य स्तरीय पारंपरिक खेळाच्या परिषदेतील होते हे विशेष. यातून त्यांना चांगले अर्थार्जन करता आले.

*** पर्यटन**: यंदा आपण कृषी पर्यटन, ग्रामीण जीवन परिचय सहल, अनुभव सहल, आनंद सहल अशा सहलीतून ७० जणांना ५ वेगवेगळ्या गावात नेले. यावेळी १६ जणींना सहल संयोजन करणे, पाहुणचार करणे, गावात चालू असणारे बचत गटाचे काम सांगणे अशा संधी मिळतील असे पाहिले.

या संयोजनाच्या संधीमुळे त्यांना सर्वांना माहिती कशी सांगावी, जेवण, नाश्ता चहा, अशा गोष्टी झाल्यावर त्या कशाप्रकारे सर्वांसमोर सादर कराव्यात, त्यातील स्वच्छता व आकर्षक मांडणी कशी असावी, अशा अनेक गोष्टी त्या शिकल्या.

*** उद्योजकता सहल**: कुसगाव येथिल १६जणी मोठा दुग्ध व्यवसाय पहायला तर पिशव्या शिवण युनिट मधल्या ४ जणींची सहल पुण्यातील असा एक उद्योग बघायला काढली होती.

*** अभ्यास**: या वर्षात स्वयंरोजगार करणाऱ्या ३० जणींच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यातून संस्थेची नेमकी कुठे मदत लागते हे समजले तर त्यांच्या उद्योगाची अधिक तपशीलात माहिती घेता आली.

| ठिकाण | विषय | संख्या | प्रशिक्षिका |
|---|---|---|---|
| मार्गासनी | शिवणवर्ग | ११ | वनिता कुंभार |
| पारवडी | शिवणवर्ग | ९ | वनिता कुंभार |
| नसरापूर | पार्लर वर्ग | १५ | दिपाली कामठे |
| पुणे | पार्लर वर्ग | २० | वैशाली डिंबळे |
| **एकूण** | | **५५** | |

*** स्वयंरोजगार पुरस्कार** : सन १५–१६ मध्ये काकासाहेब सुपनेकर उद्योजकता पुरस्कार शिवापूर भागातील सुवर्णा निघुट

**पुराणिक तंत्र निकेतनातील स्थिर व गाववार प्रशिक्षणे**

| ठिकाण | प्रशिक्षण कशाचे | सहभागी | प्रशिक्षिका |
|---|---|---|---|
| शिवापूर | लोकरवर्ग | ०७ | प्राची दाते |
| शिवापूर | शिवणवर्ग | ०८ | स्वाती शिंदे |
| शिवापूर | कापडी पिशव्या | ०६ | रोहिणीताई |
| शिवापूर | वाख वर्ग | १८ | लता प्रभुमिराशी |
| श्रीरामनगर | मेंदी वर्ग | ११ | सायली गोगावले |
| श्रीरामनगर | लोकरवर्ग | ०८ | सुनिता स्वामी |
| शिवापूर | मेंदी वर्ग | १० | सायली गोगावले |
| **एकूण६८** | | | |

(स्थिर स्टॉलवरील विक्री ), सुरेखा सोनावणे(डबे बनवणे), लीलाबाई डिम्बळे(किराणा दुकान) या ३ जणींना देण्यात आला तर २०१५ मार्च रोजी शूर वीर मराठी मावळे संस्थेतर्फे शिवऱ्याच्या शीतल खोरगडे( शेवई उत्पादन) यांचा स्वयंरोजगार पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. *****

## आरोग्य

यावर्षीचे आरोग्याचे काम पुढील ४ टप्प्यात झाले.

**१.जाणीव जागृती** **२.प्रत्यक्ष आरोग्य तपासणी**

**३.प्रतिबंधात्मक तपासणी** **४.उपचार साहाय्य**

गेली अनेक वर्ष ग्रामीण महिलांसाठी गुंजवणी खोऱ्यात आरोग्याचे काम चालू आहे. आरोग्याच्या कामाला सुरुवात जाणीव जागृती पासून केली त्यामुळे **तपासणी** ही गरज तयार झाली. त्यातही गरोदरपणा सारख्या आनंददायी आणि अत्यावश्यक सेवेपासून सुरुवात केली . मग जसजशी जाणीव जागृती होत गेली तसतशा आरोग्याच्या विविध गरजा लक्षात यायला लागल्या.

### १. आरोग्य विषयक जाणीव जागृती :

**आरोग्यविषयक उदासीनता पळाली:–** पूर्वी गावात आरोग्य तपासणी ठरवली, डॉक्टर गावात पोचले तरी सुद्धा लोक तपासणीला यायचे नाहीत, एवढी स्वतःच्याच आरोग्याविषयी उदासीनता होती. सातत्याने जागृतीचे काम केल्यामुळे प्रतिसाद सुधारला. वेळेत उपचार केला नि बचत गटात नाव असले तर उपचारही परवडणारा होऊ शकतो हे लक्षात आले. त्यामुळे तपासणी केल्यावर अडचण लक्षात आलीच तर उपचार करायला हवा असेही वाटायला लागले. दहा वर्षांच्या कामानंतर यंदा आपले आरोग्याचे काम या टप्प्यापर्यंत पोहोचले हे सांगण्यास आनंद होत आहे.

* **आरोग्य शिक्षण:**–लहान वयात आरोग्य शिक्षण दिले तर आरोग्य ही माहिती न राहता संस्कार होईल म्हणून आरोग्य विषयक जाणीव जागृतीच्या तासिका शाळेतल्या मुलींसाठी घ्यायचे ठरवले व तशा ८ शाळांमधील विद्यार्थिनींसाठी या वर्षी वैद्य मनिषा उपाध्ये यांनी तासिका घेतल्या. या तासिकांना आहार आणि आरोग्याच्या परस्पर संबंधांवरील व्याख्याने घेतली. तसेच स्थानिक भागात उपलब्ध असलेल्या गोष्टींपासून जो आहार बनतो, त्यातील पोषणमूल्यांविषयीची माहिती मुलींना दिली. कोणता आहार कोणत्या ऋतुमध्ये घ्यायचा याविषयी माहिती दिली.

* **पौगंडावस्थेतील बदलाविषयी**: पौगंडावस्थेतील होणाऱ्या शारीरिक व मानसिक बदलांविषयीचे मार्गदर्शन किशोरींना केले. त्याशिवाय पाळी व त्याकाळातील स्वच्छता याविषयी मुलींशी सविस्तर बोलणे केले.

* **युवतींसाठी मार्गदर्शन**: कॉलेजमध्ये जाणाऱ्या युवतींसाठी ‘उमलत्या वयाशी जुळवून घेताना’ अशी एक दिवसीय कार्यशाळा ९० युवतींसाठी घेतली. या कार्यशाळेत पौगंडावस्थेतील बदलांविषयीची माहिती अनेक खेळ व कृतींमधून त्यांना देण्यात आली.

* **स्त्री रोगा विषयी जाणीव जागृती**: गेल्या दोन वर्षांपासून डॉ. शुभांगीताई कानिटकर या स्त्री रोग तज्ज्ञ विविध गावांमध्ये जाऊन स्त्रियांच्या आजारपणा बद्दल जाणीव जागृतीचे काम करीत आहेत. त्यात तक्त्यांच्या व चित्रांच्या आधारे कॅन्सरविषयीची माहिती तपशीलात देण्याचे काम करत आहेत. स्त्री–डॉक्टर असल्यामुळे दुर्गम गावातील महिलाही आपल्या अडचणी अगदी मनमोकळेपणाने मांडत आहेत.

* **मानसिक स्वास्थ्यावरील कार्यशाळा:** डॉ. ज्योती कानिटकर, मानसतज्ज्ञ, यांनी ३५ महिलांसाठी वेल्ह्यामध्ये एक कार्यशाळा घेतली. मानसिक स्वास्थ्य व आरोग्याविषयीची जाणीव जागृती या कार्यशाळेत झाली. शरीराच्या आजाराप्रमाणे मनाचा आजारही असू शकतो त्यासाठी देवाचे लागले म्हणण्या पेक्षा मानसोपचार तज्ज्ञाकडे गेल्यास लवकर उपाय योजना होऊ शकते यावर चर्चा झाली व अशा व्यक्तीच्या वर्तनातील लक्षणांवर चर्चा झाली.

### २. प्रत्यक्ष आरोग्य तपासणी

* **गरोदर मातांची तपासणी:** आंबवणे येथे एक अपवाद वगळता गेल्या १० वर्षांत दरमहा एकदा अशा ११९ वेळा गरोदर मातांची तपासणी झाली. यामध्ये परिसरातल्या ८० गावांमधील साधारण ७०० गरोदर माता दरवर्षी आपल्याकडे आजवर तपासणीसाठी आल्या. आता एकेक महिला गरेदरपणाच्या काळात ६ वेळा तपासायला येते. नवी नोंदणी व अनुधावनाची तपासणी मिळून हा आकडा आजवर ५००० वेळा तपासणी असा झाला आहे. दहा वर्षांपूर्वी, दवाखान्यांमधून बाळांच्या जन्मांचे प्रमाण वाढावे, यासाठी

**देणगीदार: स्त्री शक्ती प्रबोधन ग्रामीण या विभागासाठी गेल्या वर्षी खालील व्यक्तींनी देणगी दिली**

✱ श्री. अनंतजी सेटलवाड यांनी स्वतःचा बहुमोल वेळ हा ग्रामीण स्त्रियांच्या विकासाची प्रक्रिया काय असावी या संदर्भात चर्चा व झालेल्या विविध प्रयोगांचे निष्कर्ष तपासण्यासाठी दिला. वर्षभरात त्यांनी रु. १७ लक्षाचा निधी या कामासाठी उपलबध करून दिला.

✱ दुर्गम भागातील मुलींचे शिक्षण चालू राहावे, यासाठी आपल्या गिरीकन्या या मुलींच्या सहनिवासातील भोजनाचा खर्च परांजपे प्रतिष्ठान यांनी रु. २,४५,०००/– देऊन उचलला.

✱ देवधर क्लासेस रु.१,१०,०००/–, प्रदीप जी. मराठे– रु. ७२,०००/– डॉ. दिपलक्ष्मी चित्रे रु. ३५०००/– इनरव्हील क्लब– ३५०००/– नितीन इंगळे २५००० डी. व्ही. ब्रह्मे– २००००/–

✱ दुर्गम भागातील बालवाडी चालविण्यासाठी वर्षाचा खर्च रु. १८,०००/– देणारे देणगीदार :–डॉ. सुप्रिया गाडेकर, अनिता देशमुख

✱ नरेंद्र टोळे–रु.१५०००/–श्री. राजीव हजीरनीस– रु. १५,०००/– डॉ. संजय करवडे रु.१२०००/–

| महिना | गरोदर माता तपासणी | स्त्री रोग विषयक | वंध्यत्व उपचार |
|---|---|---|---|
| एप्रिल१५ | ४९ | ६ | ४ |
| मे | ५२ | ७ | ३ |
| जून | ५१ | ६ | ८ |
| जुलै | ६५ | १३ | १४ |
| ऑगस्ट | ५५ | ५ | ५ |
| सप्टेंबर | ६१ | ९ | ६ |
| ऑक्टो | ५१ | ६ | ८ |
| नोव्हें | ३८ | ४ | ६ |
| डिसेंबर | ४० | ५ | ८ |
| जाने १६ | ३७ | १० | १४ |
| फेब्रुवारी | ५० | ५ | ९ |
| मार्च | ४९ | १० | ६ |

हे काम सुरू केले. आता त्याचे उत्तम परिणाम दिसत आहेत. पाटणकर नर्सिंग होमच्या २ स्त्री रोग तज्ज्ञ, परिचारिका आणि अन्य असा ६ जणींचा गट यासाठी सातत्याने येत आहे. गरोदर महिलांची मोफत तपासणी, त्यांना औषधे व लसीकरण असे शिबिरात होते.

*** वंध्यत्व तपासणी** : वंध्यत्वाचा प्रश्न असलेल्या जोडप्यांचीही तपासणी आंबवणे केंद्रावर केली जाते. गरज पडल्यास महिलेसोबत तिच्या नवऱ्यालाही केंद्रात तपासण्यास बोलावले जाते. गेल्या काही दिवसात अशा उपचारासाठी येणाऱ्यांची संख्याही लक्षणीय वाढली आहे. या विषयाचा संकोच तर दूर झालाच पण जाणीव जागृतीच्या कामामुळे मूल होत नसेल तर इतर कुठल्याही मार्गापेक्षा औषधोपचाराचा मार्ग स्वीकारण्याकडचा कल लक्षणीय वाढला. २७ जणींना कॅन्सर शिवाय पुढील काही इतर तपासणीची गरज होती. १३ जणींची शस्त्रक्रिया झाली.

**३. प्रतिबंधात्मक तपासणी**

तपासणीमुळे स्तनांच्या व गर्भाशयाच्या कॅन्सरचे निदान लवकर होऊ शकते, त्यामुळे वेळेत उपचार होऊन बरे होता येते.या शक्यतेची जाणीव जागृती कार्यक्रमांमुळे झाली. डॉ. शुभांगीताई कानिटकर यांनी महिलांची गावोगावी जाऊन कॅन्सरसंबंधी तपासणी केली.

**पॅप टेस्टचे तपशील (एप्रिल१५ ते मार्च १६)**

| क्र. | गावाचे नाव | उपस्थिती | तपासणी (पॅप टेस्ट झाली) |
|---|---|---|---|
| १ | शिवापूर(४वेळा) | ७० | ३२ |
| २ | रांझे | १० | ८ |
| ३ | श्रीरामनगर | २७ | १७ |
| ४ | कुसगाव | २५ | १५ |
| ५ | शिवरे | ४५ | १३ |
| ६ | कासुर्डी | ५४ | २७ |
| ७ | गाऊडदरा(२वेळा) | ४० | २२ |
| ८ | नसरापूर | १५ | १५ |
| ९ | कल्याण | ३० | १७ |
| १० | निधान | १२ | १२ |
| १४ तपासणी शिबिरात मिळून ३२८ जणींची जाणीव जागृती व १७८ जणींची पॅप टेस्ट झाली. | | | |

*** मोतीबिंदू तपासणी**: शिरवळ येथील कमलाबाई मेहता नेत्र रुग्णालयाच्या मदतीमुळे गेली ४ वर्षे आपण गावागावांमधून मोतिबिंदूच्या तपासणीची शिबिरे आयोजित करतो. रुग्णालयाच्यावतीने शिबिरापूर्वी एक दिवस आधी त्या गावाच्या परिसरात गाडीने फिरुन शिबिराची माहिती सांगितली जाते. गावातील प्रबोधिकेच्या मदतीने ग्रामस्थांना शिबिराविषयी माहिती दिली जाते. ३५ वर्षांपुढील वयाचे ३५+जण मोतिबिंदूची तपासणी करून घेतात. या वर्षी अशी शिबिरे कासुर्डी व सांगवी मध्ये घेण्यात आली.

**४. आरोग्य तपासणीनंतर उपचार साहाय्य**

**गरोदर मातांची प्रसूतीः** नर्सिंग होममध्ये नाव नोंदवून वर्षभरात १६जणींची प्रसूती झाली.*** वंध्यत्वावर उपचार** : वंध्यत्वाची तपासणी केल्यावर प्रश्न असणाऱ्या जोडप्यांना उपचाराची आवश्यकता होती, त्यांच्यावर पाटणकर नर्सिंग होमच्या वतीने अल्प दरात उपचार केले गेले. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे या वर्षी असे उपचार घेणाऱ्या ३१ जोडप्यांपैकी १२ जणांना उपचारानंतर अपत्य प्राप्ती झाली.

*** मोतीबिंदू शस्त्रक्रियाः** गावातील डोळे तपासणी झाल्यावर ज्यांना मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेची गरज असते, अशांसाठी शिरवळला नेऊन शस्त्रक्रिया करण्यात येते. यंदा अशा ८ जणांच्या मोफत शस्त्रक्रिया झाल्या.

*** उपचारासाठी समन्वयकाची भरः** तपासणी नंतर उपचार घेताना येणाऱ्या अडचणी पार करण्यासाठी समन्वयाचे काम गंगुताई गेली काही वर्षे करत आहेत. या वर्षी त्यांच्या सोबत कावेरीताई शिवरकर यांनीही असे काम केले. मुख्यतः पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालय व प्रसंगी नवले हॉस्पिटल यांच्यासोबत हे काम केले. रुग्णांना दवाखाना दाखविणे, तेथील डॉक्टरांकडे नेणे, तेथील ऑपरेशन व इतर उपचारांकरिता कागदपत्रे व इतर गोष्टींच्या पूर्ततेसाठी मदत करणे, अत्यल्प दरात उपचार होण्यासाठी चॅरिटी विभागाशी संपर्क साधणे अशी सर्व कामे समन्वयकांनी केल्यामुळे वर्षभरात नवले रुग्णालयात ४ तर दीनानाथ रुग्णालयात १४ अशा १८ रुग्णांची ऑपरेशन होऊ शकली. यामध्ये हार्निया, मूळव्याध, गळू याविषयी तर गर्भाशयातील गाठी व स्तनांच्या गाठींविषयीचे उपचार झाले. साधारण १० लक्ष रुपयांचे काम या रुग्णालयांनी आपल्या भागातील लोकांसाठी केले.

**आरोग्या संबंधी अन्य गोष्टी**

*** जंत निर्मूलनासाठीची उपाययोजनाः**महिलांसाठी काम करताना असे लक्षात आले, की महिला व अन्य गावकरीही विविध प्रकारच्या रक्तक्षयाचे रुग्ण आहेत. रक्तक्षय हा पोटात असलेल्या जंतांमुळेही होऊ शकतो. गेल्या वर्षी रक्ततपासणी झाली, त्यात रक्तक्षयाचे जे रुग्ण आढळले त्याचे मुख्य कारण पोटातील जंत असे होते. अशा रुग्णांसाठी यंदा आपण जंताच्या ८०० गोळ्या अल्प दराने दिल्या. अल्प दराने पण स्वतःच्या खर्चाने या वर्षी प्रथमच गोळ्या घेतल्या. हळूहळू ग्रामस्थांमधील झालेली जाणीव जागृती लक्षात येत आहे.

*** आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये निबंधाचे वाचनः** वैद्या मनिषा उपाध्ये यांनी स्त्री आरोग्यावरील दुसऱ्या राष्ट्रीय परिषदेत वरील अनुभवावर आधारित 'डी वर्मिंग' ( जंत निर्मूलन) या विषयावर पेपर वाचला.

*****

# नेतृत्व विकसन

**✻ सहली** : बचत गटातील महिलांचे भावविश्व विस्तारावे यासाठी सहलींचे आयोजन केले जाते. स्वखर्चाने केवळ महिला-महिलांनी सहलीला जाण्याचा अनुभव वेगळाच आत्मविश्वास देऊन जातो. याचसाठी जाणीवपूर्वक हा उपक्रम आपण गेली अनेक वर्ष सातत्याने करत आहोत. आता या सहलीचे आयोजन गावपातळीवरील कार्यकर्ती करते. ठिकाण ठरवणे, महिलांना सहलीला यायला तयार करणे, प्रत्यक्ष सहलीचा निरोप देणे, खर्चाचा अंदाज काढणे, गाडी ठरवणे, पैसे गोळा करणे, सहलीत खर्च करणे, सहली नंतर हिशोब देणे असे सगळे! यावर्षीचे तपशील खालील तक्त्यामध्ये पाहावेत.

या१५२ पैकी ५५ महिला सहलीच्या निमित्ताने प्रथमच घराच्या बाहेर पडल्या होत्या. बालाजीची सहल ही ५ दिवस ६ रात्री अशा कालावधीची असते. त्यासाठी साधारण माणशी रु. ३,५००/- खर्च येतो. असा खर्च स्वतःच्या सहलीसाठी उभारणे हे सुद्धा आता जमायला लागले आहे. या सहलीसाठीही गटातून कर्ज घेतलेल्या ६५ जणी होत्या.

**✻ नवरात्र मेळावे**: यंदा नवरात्र मेळावे घ्यायचे ठरवण्यापासून सर्व नियोजन गाव-प्रतिनिधींच्या बैठकीत झाले व मेळावे पार पडले. एकूण ३० जणींनी हा उपक्रम घडवण्यासाठी कुठल्यातरी प्रकारचा सहभाग घेतला. या मेळाव्यात काही खेळ घेतले तर उपासाचे पदार्थ बनवण्याची स्पर्धाही घेतली. स्पर्धेतील सहभागींना बक्षिसे दिली. हे वर्ष कै. आप्पा पेंडसे यांचे जन्मशताब्दी वर्ष होते. यानिमित्त ३० महिलांनी त्यांचे चरित्र मेळाव्यांत सांगितले. **कार्यकर्त्यांचा सहभाग** वरील कार्यक्रमाच्या संयोजनात१२ गट प्रमुखांनी प्रथमच संयोजनाची संधी घेतली. एकूण १४ गावांमधून ४७१ महिलांनी मेळाव्यात सहभाग घेतला.

**✻ संक्रांत तीळगूळ मेळावे**: गेली ८ वर्षे महिलांना गावपातळीवर एकत्र येण्याची अशी संधी मिळावी यासाठी आपण संक्रांतीला तीळगूळ मेळाव्यांचे आयोजन करत आहोत. यंदा खालील ५ गावात मेळावे झाले, त्यात ४३५ जणी सहभागी झाल्या होत्या. या मेळाव्यात प्रबोधिनीच्या स्त्री शक्ती प्रबोधन विभागात येणाऱ्या सर्व उपक्रमांची माहिती व्हावी अशी योजना केली होती.तीळगूळ वाटप तर होतेच पण त्या बरोबरच महिला काही खेळही खेळल्या. एकत्रित खेळामुळे गटात मोकळेपणा आल्यामुळे गाव पातळीवर येणाऱ्या अडचणींवर चर्चा केली व काही एकत्रित उपाय सापडतो का? यावरही चर्चा केली. गावाच्या कामात महिलांनी आपणहून पुढाकाराने काम करावे, यासाठी अशी योजना केली होती. विशेष उल्लेख करावा असे झाले ते कासुर्डी गावात! येथील मेळाव्यात आरोग्याच्या अडचणीवर बोलणे झाले व महिलांनी एकत्रित डोळे तपासणी करायची ठरवले. प्रबोधिनीच्या शिरवळच्या नेत्र रुग्णालयाची मदत घेऊन त्यांनी तपासणी शिबिर ठरवले व गावातील ४ लोकांची मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झाली हे विशेष! मेळाव्यात फक्त चर्चे पुरत्या चर्चा करायच्या नसतात तर कामासाठी चर्चा करायच्या असतात, हे त्यामुळे गट शिकला.

### संधी

ग्रामीण महिलांना संधी दिली तर त्यांची स्वतःची अशी नेतृत्वाची शैली विकसित होते. त्यामुळे नेतृत्वाचं काम करताना लक्षात येतं की सगळ्यात महत्त्वाचं काय असतं तर जिच्या तिच्या क्षमतेप्रमाणे जिला-तिला संधी उपलब्ध करून देणे. त्यासाठी छोट्याशा पण नेमक्या कामाची योजना करणे. प्रत्यक्षात असे काम करताना अडचणी आल्याच तर मार्गदर्शनासाठी कोणी तरी उपलब्ध असणे.

या वर्षी ठरवून अशा संधी महिलांना उपलब्ध करून दिल्या. बचत गटाशी संबंधित संधी म्हणजे जबाबदारीने हिशोब ठेवणे, गटाचे कर्जासाठी फॉर्म भरणे, पैसे ठेवायला काढायला एकटीने बँकेत जाणे, कर्ज आणण्यासाठी गावातील महिलांना बँकेत घेऊन जाणे इ. गाव पातळीवर आरोग्याचे काम करण्याची संधीही या वर्षी १० जणींनी घेतली. त्यामुळे या सगळ्यांची आरोग्य प्रश्नाबद्दलची जाणीव जागृती इतरांपेक्षा जास्त झाली. वर्षभरात गाव पातळीवर हिशोबाचे नाहीतर नवरात्रीचे नाहीतर संक्रांतीचे असे ४० मेळावे गावागावात झाले. त्या मेळाव्यांचे संयोजनसुद्धा गाव प्रतिनिधींनी केले. गावात कुठला मेळावा योजायचा? हे ठरवायचे, महिलांना निरोप द्यायचे, कार्यक्रम ठरवायचा, जागा निश्चित करायची, पाहुण्यांचा परिचय करून

**सहलींचा तपशील**

| क्र | गावे | ठिकाण | संख्या |
|---|---|---|---|
| १. | रांझे | अष्ट विनायक | ३० |
| २. | वेल्हे | कोल्हापूर | ३५ |
| ३. | कासुर्डी | अष्ट विनायक | ४० |
| ४. | रहाटवडे, कासुर्डी | बालाजी | ४७ |
| | | एकूण | १५२ |

| क्र. | गावाचे नाव | सहभागी | क्र. | गावाचे नाव | सहभागी |
|---|---|---|---|---|---|
| १ | विहीर | ३० | ८ | बोरावळे | २९ |
| २ | कोदापूर | १९ | ९ | सोंडे | ४० |
| ३ | घिसर | ३० | १० | वाजेघर | ४० |
| ४ | भट्टी | ३० | ११ | निधान | ४० |
| ५ | वडगाव झांजे | ३५ | १२ | कोदवडी | ४० |
| ६ | केळद | ५३ | १३ | आंबवणे | ३० |
| ७ | वरोती | ३० | १४ | नसरापूर | २५ |
| **गाववार नवरात्र मेळावे उपस्थिती एकूण** | | | | | **४७१** |

**संक्रांत मेळावे**

| क्र | गाव | संख्या |
|---|---|---|
| १ | शिवरे | १७० |
| २ | नसरापूर | ४५ |
| ३ | खोपी | ७० |
| ४ | सांगावी | ५० |
| ५ | कासुर्डी | १०० |
| | एकूण | ४३५ |

द्यायचा आणि नियोजित संख्येने सारं पार पाडायचं! अशी एरवी करायला न मिळणारी कामाची संधी जी महिला घेईल ती इतरांच्या मानाने अधिक पुढे जाते. हे जसे सार्वजनिक कामाचे तसेच स्वयंरोजगार या वैयक्तिक विषयात सुद्धा ५ जणींनी काम केले. त्यासाठीही 'मी' ची पारंपरिक चौकट मोडावी लागते. ४ जणींनी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच ग्राम पंचायतीत काम केले. यासाठी त्यांना गटाने आधार दिला आणि प्रबोधिनीने मार्गदर्शन केले. अशा संधी स्वयंस्फूर्तीने जी वारंवार घेते ती नेतृत्व या विषयात पुढे पुढे सरकताना दिसते!

* **तंबूतील निवासी शिबिर** (बोरावळे): पारवडी–बोरावळे या गावातील महिलांनी पुढाकार घेऊन गावात तंबूतील शिबिर घेतले. शिबिरात पहिल्या दिवशी गटागटात पथनाट्ये केली. नाटकाचे विषय हुंडा, स्त्री–पुरुष समानता, अंधश्रद्धा असे होते. त्या निमित्त महिला मोकळ्या झाल्या. अनेकजणी अशा प्रकारच्या शिबिरात प्रथमच सहभागी झाल्या होत्या. यात आरोग्य तपासणी झाली. विशेष म्हणजे हे शिबिर यशस्वी व्हावे म्हणून गावानेही खूप मदत केली अगदी शिबिरासाठी जागा लेव्हल करून देण्यापासून ते बायकांची सोय व्हावी म्हणून देवळापाशी असणारी टाकी पंप दुरुस्त करून पाण्याने भरण्या पर्यंत!

* **तंबूतील नेतृत्व शिबिर**: डिसेंबर महिन्यात गावातून महिला विहीर या गावी तंबूमधल्या मुकामी शिबिरात सहभागी व्हायला आल्या होत्या. बहुतेक जणी गावात नेतृत्व करणाऱ्या होत्या. शिबिरामध्ये जानेवारीत योजलेल्या प्रात्यक्षिकांच्या तयारी बरोबरच गावाचे वर्षभराचे नियोजन त्यांनी केले. खेळ खेळल्या. या शिवाय येत्या वर्षात खोरे विकासासाठी कुठल्या मुद्द्यांवर काम करायला हवे असे गटांनी स्वतंत्रपणे नोंदवले. अशा १०० मुद्यांची नोंद त्यांनी केली. विकासाचा एकत्रित विचार करायला सगळ्या शिकल्या हे त्यामुळे लक्षात आले. या शिबिराचा परिणाम म्हणूनच पारवडीच्या शिबिराची योजना झाली.

* **संवादिनी गट** : नसरापूर येथे संवादिनी गट २०१३ पासून जमतो आहे. संवादिनी हा स्वेच्छेने जमणारा गट. या गटात येणाऱ्या स्थानिक महिलांना बहुतेकींना समाजासाठी काही काम करावे अशी इच्छा आहे. या वर्षात हा गट ६ वेळा जमला. त्यांनी आपल्या वेल्हे वसतिगृहाला भेट दिली. या भेटीत त्यांनी मावळातील मुलींच्या शिक्षणासाठी आपण करीत असलेले काम जाणून घेतले. तसेच डिसेंबर मध्ये मातृभूमी पूजनाचा कार्यक्रम घेतला.

* **दक्षता समिती**: गेल्या वर्षी दक्षता समिती सदस्यांचे प्रशिक्षण आपण घेतले होते. या वर्गाचा समारोप नियमित येणाऱ्या १२ जणींना, शाहीद पठाण या वेल्ह्याच्या पोलीस इन्स्पेक्टर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन करण्यात आला. तालुका पातळीवर कौटुंबिक समस्यांवर अभ्यास करण्याचे व व्यक्तिगत मार्गदर्शन करण्याचे काम या वर्षात समितीतील सदस्यांनी केले.

* **नियमित मासिक प्रशिक्षण बैठकींचे संयोजन**: जिजामाता बैठक (शिवापूर), नवदिशा (आंबवणे), वेल्हे प्रबोधिका (वेल्हे) अशा दरमहा बैठकी वर्षभर चालवल्या. दरमहा होणाऱ्या या बैठकीमध्ये मिळून एकूण ४० प्रबोधिका नियमित सहभागी होत होत्या. न चुकता होणाऱ्या या बैठकीमुळे गाव पातळीवर काम करणारा गट या वर्षी नव्याने उभा राहिला असे निश्चितच म्हणता येईल. बैठकीत येणाऱ्या या प्रबोधिकांनी गाव पातळीवरील सर्व प्रकारच्या उपक्रमाचे संयोजन केले. **'माझ्या गावात मीच प्रबोधिनी'** अशी त्यांची भूमिका तयार होते आहे.

* **स्मरणिका प्रकाशन**: कामाच्या द्विदशकपूर्ती निमित्ताने ***'स्त्री शक्तीच्या पायवाटा'*** अशी स्मरणिका काढली. या स्मरणिकेत ५२ जणींनी स्वतःच्या कामाबद्दल लेखन केले. बहुतेकींनी आयुष्यात प्रथमच असे लेखन केले. असे लेखन करण्यासाठीचा आत्मविश्वास वाढला आणि अर्थातच कामाबद्दलची आत्मीयता! ही स्मरणिका प्रत्यक्ष काम करणाऱ्या सर्व स्थानिक कार्यकर्त्यांनी मिळून केली त्यामुळे त्याच्यासाठी जाहिरात संकलनही केले. शिवगंगा, गुंजवणी खोऱ्यातील हितचिंतकांनी त्यासाठी अर्थसाहाय्य दिले. लिहिण्याचा अनुभव नसलेल्या कार्यकर्त्यांचा लिखाणाचा पहिलाच प्रयत्न असल्याने ती साहित्यिक अंगाने नसली, तरी अनुभव कथनाच्या अंगाने वाचनीय झाली आहे.

* **प्रात्यक्षिके सहभाग**: नेतृत्व करायचे तर महिलांनी स्वतःचेच एखादे उदाहरण घालून द्यायला हवे. गणपतीमध्ये पुण्यातल्या महिलांना ढोल वाजवताना बघून आपणही असे करावे असे ग्रामीण महिलांच्या अनेकदा मनात येत होते. यंदा ठरवून २ जणी ताशा तर ८ जणी ढोल वाजवायला शिकल्या. काहींना लेझिम येत होते पण अनेक वर्षात केले नव्हते. अशा १२ जणींनी तयारी करून ढोल–ताशाच्या तालावर लेझिमचा सराव केला. अशा १० जणींनी न लाजता गणवेशात लेझिमचे प्रात्यक्षिक ५०० जणांसमोर दापोडे येथे सादर केले हे विशेष!

* **प्रतिज्ञा ग्रहण**: सन २०१५ हे द्विदशकपूर्तीचे वर्ष असल्यामुळे काही कार्यक्रमाची त्या दृष्टीने योजना केली होती. गाव पातळीवरच्या नियमित काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा प्रतिज्ञा ग्रहण कार्यक्रम हा त्याचाच एक महत्वाचा भाग होता. या कार्यक्रमात १७ जणींनी प्रथम तर ७ जणींनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली. तर पुण्यातल्या कार्यक्रमांत ५ जणींनी तृतीय प्रतिज्ञा घेतली. एकत्र काम करणाऱ्या, एकाच विभागातल्या एवढ्या सदस्यांनी घेतलेल्या प्रतिज्ञा ग्रहणाचा कदाचित हा पहिलाच प्रसंग असेल.

* **पुरस्कार**: शैलाताई भोंडेकर यांनी गेल्या अनेक वर्षांत जे महिला प्रबोधानाचे काम केले त्यासाठी त्यांना ***'चतुरस्त्र नारी'*** असा पुरस्कार मानकर न्यासातर्फे पुण्यामध्ये देण्यात आला. भारतीताई खासबागे यांना बचत गटाद्वारे महिला संघटनाचे काम केल्याबद्दल ***'क्रांतीसूर्य'*** पुरस्कार विदर्भातील पुण्यातल्या मंडळींनी दिला.

*****

# ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक कै. आप्पा पेंडसे जन्मशताब्दी वर्षाचा कार्यक्रम

# क्रीडा प्रात्यक्षिके

**बागेश्री पोंक्षे**

ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक कै. आप्पा पेंडसे यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने आणि स्त्री शक्ती प्रबोधन ग्रामीण विभागाच्या बचतगटांच्या कामाला सुरुवात होऊन २० वर्षे झाल्या बद्दल क्रीडा प्रात्यक्षिकांचा कार्यक्रम ठरविण्यात आला. सुरुवात किशोरींची प्रात्यक्षिके करुयात अशी झाली आणि अंतिमतः दुर्गम भागातील बालवाडीतील मुलांपासून बचतगटातील ज्येष्ठ सदस्यांपर्यंत सर्वांनीच या प्रात्यक्षिकात सहभाग घ्यायचे ठरविले. एकूण ३० गावांमधील २५० सदस्यांनी प्रात्यक्षिकात सहभाग घेतला. ५५ गावांमधून आलेल्या ५०० प्रेक्षकांसमोर **क्रीडा प्रात्यक्षिक**ांचा कार्यक्रम झाला.

**पूर्वतयारीः-**

प्रात्यक्षिकांच्या पूर्वतयारीसाठी किशोरींचे एक व युवती आणि महिलांचे एक अशी दोन शिबिरे झाली. त्याचा वृतांत यात आपण वाचला आहेच. ती संपूर्ण शिबिरेच सरावासाठी होती.

स्मरणिकेसाठी सर्व कार्यकर्त्यांनी आपापले अनुभव लिहून दिले. ५२ लेखिकांपैकी ३८ जणींनी अशा प्रकारचे लेखन प्रथमच केले. ' काम काय करायचे ते बोला, लिहायला सांगू नका' असे म्हणणाऱ्यांनी अत्यंत मनःपूर्वक आणि तळमळीने लेखन केले. काहींनी तर लेखकू घेऊन लिहिले! ६ महिने ही सर्व प्रक्रिया चालू होती.

प्रतिज्ञा ग्रहणासाठी भूमिका सांगणाऱ्या ३ बैठका झाल्या. शिवापूर, आंबवणे, वेल्हे अशा सर्व कार्यकर्ता बैठकीत चर्चा होऊन २५ कार्यकर्त्यांनी मा. संचालकांना प्रतिज्ञग्रहणासंबंधी परवानगी घेण्यासाठीचे पत्र लिहिले. या सर्व प्रक्रियेत 'माझ्या गावात मीच प्रबोधिनी' असे जबाबदारीने म्हणून किमान त्या प्रकारे १ वर्ष काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला हे विशेष!

**सूत्रसंचालनः** संपूर्ण कार्यक्रमातील क्रीडा प्रात्यक्षिकांची जबाबदारी अश्विनीताई ठाकर यांनी तर प्रात्यक्षिकांमधील महिलांचा सहभाग आणि **प्रतिज्ञाग्रहण** व **स्मरणिका प्रकाशन** कार्यक्रमांची जबाबदारी अन्य महिला कार्यकर्त्यांनी घेतली. सूत्र संचालन अश्विनीताई ठाकर व आशाताई सुर्वे यांनी केले.

*** प्रात्यक्षिके –** दिवाळी सुट्टीमध्ये झालेल्या तंबू शिबिरानंतर शालेय किशोरींनी अतिशय जिद्दीने खेळांचा सराव केला. प्रात्यक्षिकांसाठी तानाजी मालुसरे विद्यालय, दापोडे यांनी शाळेचे मैदान उपलब्ध करून दिले. बालवाडीतील छोटी चिमुरडी, किशोरी ते ज्येष्ठ महिलांपर्यंत लोकांनी या प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग घेतला होता. संचलन, लेझीम, वेत्रचर्म, ढाल-तलवार, संगीत जोडी, बांबू नृत्य, मानवी मनोरे, सायकल कसरत, संगीताच्या तालावर दोरीच्या उड्या, वाद्य वाजवणे व गायन, चिमुकल्यांच्या बेडूक उड्या, महिलांचे लेझीम व ढोल ताशा पथक, पारंपरिक खेळ अशी १५ प्रात्यक्षिके दापोडे विद्यालयाच्या त्या भव्य मैदानावर सादर करण्यात आली. ही प्रात्यक्षिके बघायला पुण्याहून तसेच स्थानिक भागातून ५०० पेक्षा जास्त लोक उपस्थित होते. सुमारे दीड तासाच्या कालावधीमध्ये प्रात्यक्षिके सादर झाली. अतिशय शिस्तीत व प्रेरणेचा अनुभव देणारी ही प्रात्यक्षिके झाली. सरावासाठी घेतलेली मेहनतही दिसत होती. वेल्हे तालुक्यात प्रथमच अशा प्रकारचा वेगळा कार्यक्रम सादर केल्याचा आनंद सगळ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

*** प्रतिज्ञा ग्रहणः-**प्रात्यक्षिकांच्या सादरीकरणानंतर ज्ञान प्रबोधिनी स्त्री-शक्ती प्रबोधन या विभागात नियमित काम करणाऱ्या २४ कार्यकर्त्यांनी समाजसेवेचे व्रत अविरत करण्याची प्रतिज्ञा घेतली.

*** स्मरणिका प्रकाशन**: तसेच स्त्री शक्तीच्या कार्याला २० वर्षे पूर्ण झाल्याने या वर्षात अनेक महिला कार्यकर्त्यांनी घेतलेले अनुभव लिहिलेल्या **स्मरणिकेचे प्रकाशन** प्रबोधिनीचे संचालक मा. डॉ. गिरीशराव बापट यांच्याहस्ते करण्यात आले. शाळेतील किशोरींनी आपापल्या शाळेच्या गणवेशात प्रात्यक्षिके सादर केली. महिलांनीही प्रात्यक्षिके केली.

*** ज्येष्ठांचे मार्गदर्शनः-** या कार्यक्रमाला ज्ञान प्रबोधिनीचे संचालक मा. डॉ. गिरीशराव बापट, कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे तसेच प्रबोधिनी परिवारातील जेष्ठ मान्यवर व कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते. वेल्हे तालुक्याचे उपसभापती श्री. चंद्रकांत आप्पा शेंडकर कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांचे मार्गदर्शन सर्वांना लाभले.

**मदतीचे हातः** ग्रामीण किशोरी व महिलांची प्रात्यक्षिके आहेत म्हटल्यावर अनेक मदतीचे हात पुढे आले. त्यामध्ये श्री. तानाजी मांगडे(मांगदरी) यांनी त्यांच्या मंगल कार्यालयातील खुर्च्या एक दिवसासाठी मोफत दिल्या, धानेपच्या मळेकर काकांनी कमीत कमी खर्चात भव्य मंडपाची व्यवस्था केली, दापोडे गावातील लोकांनी तांत्रिक मदत केली. प्रात्यक्षिकांच्या सर्व पूर्वतयारी मध्ये किशोरींपासून कार्यकर्त्यांपर्यंत सगळ्यांच्याच अनुभवाच्या व आत्मविश्वासाच्या कक्षा रुंदावल्या. एक अविस्मरणीय असा अनुभव मिळाला.

कै. आप्पांचे जन्मशताब्दी वर्षाला साजेशा स्वरचित घोषणा मानवी मनोरे सादर केलेल्या गटाने दिल्या. सर्व प्रेक्षकांचे लक्ष या गटाने आपल्या घोषणांमधून व सादरीकरणामधून वेधून घेतले.

प्रात्यक्षिकात सायकल कसरत केलेल्या विंझर मधल्या किशोरींना सायकली भेट देण्यात आल्या. भेट दिलेल्या सर्व किशोरी आता दररोज सायकलवर शाळेत जाताना - येताना दिसतात.

*****

# विज्ञान मेळावे

**अश्विनी ठाकर, किशोरी विकास प्रमुख**

**❋ विज्ञान मेळावेः** एप्रिल महिन्यात सर्व शाळांना उन्हाळी सुट्ट्या लागल्या की गावा गावांमधून किशोर मुला–मुलींसाठी मेळावे घेण्यात येतात. हे मेळावे घेण्यामागचा हेतू म्हणजे ग्रामीण युवतींना हे विज्ञान मेळावे घेण्याच्या निमित्ताने नेतृत्वाची संधी मिळावी त्या बरोबरच जास्तीत जास्त किशोरवयीन मुला– मुलींपर्यंत विज्ञान दृष्टी पोहचावी हा असतो. या हेतूने **८ ते २६ मे २०१५ या कालावधीत ७० गावातील ४ थी ते ९ वीच्या १,४७३ मुला – मुलींचे मेळावे घेण्यात आले.** गावात गेल्यावर मुलांना गोळा करणे, गाणं सांगणे, विज्ञान प्रयोग शिकवणे व प्रत्यक्ष मुलांना प्रयोग करायला देणे, खेळ घेणे असा दोन तासांचा मेळाव्याचा कार्यक्रम असतो. मेळाव्यांतील प्रयोग अगदी सोपे असतात. यावर्षी हवेच्या दाबाचे व अपकेंद्री बलाचे प्रयोग मुलींनी घेतले.

**❋ प्रयोजनः–**ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण प्रणालीत प्रत्यक्ष अनुभवांमधून शिकण्यावर भर आहे. यात स्वयंप्रेरणेने व पुढाकाराने अपरिचित ठिकाणी व अपरिचित परिस्थितीत जाऊन एखादी गोष्ट करण्याची मुद्दाम योजना केलेली असते. यात किशोरी विकास उपक्रमातील मुलींसाठी आपण गेल्या २ वर्षांपासून गाववार विज्ञान मेळावे घेण्याच्या प्रक्रियेचा समावेश केलाय. अर्थातच ही पहिली पायरी होती.

**❋ थोडे वरच्या टप्याचे उद्दिष्टः–** यासाठी पूर्वी २०१० साली किशोरी विकास उपक्रमाच्या विद्यार्थिनी असणाऱ्या आताच्या युवतींनी एकत्र येऊन सुट्टीत काहीतरी करूया म्हंटल्यावर त्यांच्यापुढे ३० गावांमधून ६०० मुला–मुलींपर्यंत पोहोचायचे उद्दिष्ट दिले. सहज करता येण्यासारखे नसावे म्हणून हा खटाटोप. त्यांना आपले व आपल्या मैत्रिणींचे, नातेवाईकांचे गाव सोडून अन्य गावात काम करण्याची जबाबदारी दिली. कमीतकमी २० मुला–मुलींसाठी मुख्यतः हवेच्या दाबावरील काही प्रयोग करून पाहणे व समजून घेण्यासाठीचे शिबिर घेण्याची जबाबदारी दोघी–दोघींवर सोपवण्यात आली.

**❋ प्रशिक्षक प्रशिक्षणः–** मागे २०१० सालच्या किशोरी विकास उपक्रमातील माजी विद्यार्थिनी, ज्या आज युवती सदस्या म्हणून संपर्कात होत्याच, अशा काही जणी, आंबवणे येथील कौशल्य प्रशिक्षणांमधून शिवण इ. कौशल्ये शिकलेल्या काही जणी, तर एम. एस. डब्ल्यू च्या अभ्यासक्रमात प्रबोधिनीसोबत काम केलेल्या दोघी, अशा २०–२२जणींनी प्रशिक्षणासाठी नावे नोंदवली. ४ मे २०१५ ही प्रशिक्षणाची तारीख ठरली.

प्रशिक्षणवर्गात सौर उर्जेवरील तसेच अन्यही काही प्रयोग हसत खेळत कसे घ्यायचे, त्या प्रयोगामागचा उद्देश, त्यांचे आपल्या जीवनातील महत्त्व याविषयीचे सत्र झाले. प्रशिक्षण घेण्यासाठी शैक्षणिक उपक्रम संशोधिकेतील कार्यकर्ते विनायकदादा माळी हे आले होते. प्रयोगातून विज्ञानाचा त्यांचा तास झाल्यावर त्यांनी मुलांना गोष्ट कशी सांगावी, व ही गोष्ट सांगता सांगता वर्तमानपत्राच्या ५ प्रकारच्या टोप्या कशा शिकवाव्यात ह्याचे सुंदर प्रात्यक्षिक घेतले.

प्रशिक्षणानंतर नेमके काय आणि कसे करायचे हे मुलींना समजले. उद्यापासून आपल्याला जोमानं कामाला लागायचं आहे आणि ३०–३५ गावांमधून आपल्यापेक्षा लहान भावंडांना शिकवायचं आहे हे चित्र प्रत्येकीच्या चेहऱ्यावर दिसत होते.

**❋ नियोजनः–**फळ्यावर भोर, वेल्हे आणि हवेली तालुक्यातील ३५ गावांची यादी होती आणि ६०० विद्यार्थ्यांचा आकडा होता. तो पाहिल्यावर सगळ्यांनीच बाप रे.... अशी पहिली प्रतिक्रिया दिली. पणा तपशीलवार नियोजन, जमलेल्या प्रशिक्षणार्थिंच्या जोड्या असे हळूहळू कागदावर आल्यावर त्यांना ते सहज साध्य वाटलं. केळवडी, कोदवडी, आंबवणे, कल्याण, कुसगाव, खोपी आणि वडगाव झांजे अशा ७ गावांमधून २२ जणी आल्या होत्या.

पुढे सलग १५ दिवस एकत्र काम करायचे होते. त्यांचा एकमेकींशी परिचय नव्हता. एक गाव दोन मुली असे गट केले. दोन वेगवेगळ्या गावातील मुलींचे गट केले. या आधी आपण ज्या गावात गेलो नाही, अशा गावांमध्ये जाण्याचे ठरले. गावातली मैत्रिण सोबत नाही, म्हणून हिरमुसलेल्या मुली आता अनोळखी गावात गेल्यावर तिथल्या मुलांना एकत्र कसे करायचे यावर चर्चा करू लागल्या. हेच तर त्यांच्यासाठीचे प्रशिक्षण होते!

*****

**ज्ञान प्रबोधिनीः स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण )**
संपर्कः ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०
दूरभाषः ०२० २४२०७१६२/१३३
शिवापूरः खेड–शिवापूर वाडा, ता. हवेली, जिल्हा पुणे, ४१२२०५, आशा : ८४२१५११०४९
आंबवणेः मातृछाया, ता. वेल्हे, जिल्हा पुणे, प्रतिभाः९४२०६७६१०५
वेल्हेः पोलिस स्टेशन जवळ, ता. वेल्हे, जिल्हा पुणे, रंजिताः ८५५१०८९६१६

**ज्ञान प्रबोधिनीला दिलेल्या देणग्या आयकर कायद्याच्या परि. ८० (जी) खाली करमुक्त आहेत.**